# गीताधर्म-प्रवेश



—: लेखक :—

पु. पां. गोखले, बी. ए.

कराड.

किंमत ८ आणे.

# दोन शब्द.

" **गीताधर्म** " नांवाचा अेक ग्रंथ सविस्तर नि सप्रमाण लिहिण्याचा समाजसेवक गोखले यांचा विचार १९३५ तच ठरला होता. त्या दृष्टीनें दरसाल गीताजयन्तीच्या वेळीं आपले कांहीं विचार स. गोखले यांनीं लेखरूपानें प्रसिद्ध केले. तेच दहा निबंध प्रस्तुत पुस्तकांत अेका धोरणानें गुंफून स. गोखल्यांचीं टिपणेंही प्रारंभीं दिलीं आहेत. त्यावरून त्यांच्या अिष्ट ग्रंथाची रूपरेखा स्पष्ट होईल.

जन्मजात धर्म अगर दीक्षेचा धर्म हा अफू असेल आणि त्याचे मन्तरतन्तर हे कदाचित् कोणास लष्करच्या कवाअीतो भासतील ! ! पण जीवन हा कलह नव्हे विकास आहे; त्यांत जसा संघर्ष आहे तसा सहकारही आहे; ह्मणून त्याला सोज्वळ स्वरूप देण्यात कला आहे. याच कलेची गुरुकिल्ली गीतेनें सांगितली, तीच गोखल्यांच्या मतें कर्तव्यशास्त्राची. हें शास्त्र ह्मणजेच गीताधर्म. तो जगांतील कोणत्याही उघडया डोळयांच्या व कानांच्या माणसाचा सनातन धर्म होय. त्याचें सोपपत्तिक विवेचन करण्याचा गोखल्यांचा मानस त्यांच्या अन्य कर्तव्यबंधनांनीं पुढेंच ढकलावा लागला आहे. तूर्त त्या दुधाची तहान प्रस्तुतच्या ताकावर भागवून घ्यावी लागत आहे. ह्मणूनच सदर पुस्तकास ' **गीताधर्म-प्रवेश** ' असें सूचक नांव दिलें आहे.

कराड,
गीताजयंति
ता. १८-१२-४२

सौ. सुलोचना गोखले.

# श्लोकवार गीता.

अध्याय १

| | |
|---|---|
| श्लोक १ ते ११ | दोनही सैन्यांतील मुख्य मुख्य शूरांची मोजदाद व सामर्थ्यवर्णन. |
| ,, १२ ते १९ | दोन सैन्यांतील शंखवाद्यांचें वर्णन. |
| ,, २० ते २७ | अर्जुनाचें सैन्यनिरीक्षण. |
| ,, २८ ते ४७ | मोहानें अर्जुन बिलबिलीत लोण्यासारखा होऊन शोक करतो. |

अध्याय २

| | |
|---|---|
| श्लोक १ ते १० | अर्जुनाच्या बावळटपणामुळें त्यासंबंधीं कृष्णार्जुनांचा संवाद. |
| ,, ११ ते ३० | सांख्ययोग ह्मणजे काय ? |
| ,, ३१ ते ३८ | क्षात्रधर्मानुसार युध्द करण्याची आवश्यकता. |
| ,, ३९ ते ५३ | निष्काम कर्मयोग. |
| ,, ५४ ते ७२ | स्थितप्रज्ञाचा महिमा. |

अध्याय ३

| | |
|---|---|
| श्लोक १ ते ८ | ज्ञानयोग व कर्मयोग यांना अनुसरून अनासक्तीनें कर्म करण्याची आवश्यकता. |
| ,, ९ ते १६ | यज्ञादि कर्मांचें महत्त्व. |
| ,, १७ ते २४ | लोकसंग्रहार्थ ज्ञान्यांना कर्मांची जरूरी. |
| ,, २५ ते ३५ | अज्ञानी व ज्ञानी कोण ? रागद्वेष सोडून |

कर्म करण्यास उत्तेजन.

श्लोक ३६ ते ४३ इच्छाविरहित होणें.

अध्याय ४

श्लोक १ ते १८ सगुण अवताराचा महिमा व निष्काम कर्मयोग.

,, १९ ते २३ योग्याचें आचरण व त्याचें महत्त्व.

,, २४ ते ३२ यज्ञ व त्यांचीं फलें.

,, ३३ ते ४२ ज्ञानाचें मोठेंपण.

अध्याय ५

श्लोक १ ते ६ सांख्ययोग व कर्मयोग यांचा निर्णय.

,, ७ ते १२ सांख्ययोगी व कर्मयोगी यांचीं लक्षणें.

,, १३ ते २६ ज्ञानयोगाचा विषय.

,, २७ ते २९ भक्तिसहित ध्यानयोगाचें वर्णन.

अध्याय ६

श्लोक १ ते ६ कर्मयोग व योगारूढ पुरुषाचें लक्षण.

,, ५ ते १० आत्मोध्दारास प्रेरणा व भगवत्प्राप्ति झालेल्या पुरुषाचें लक्षण.

,, ११ ते ३२ विस्तारपूर्वक ध्यानयोग.

,, ३३ ते ३६ मनोनिग्रह.

,, ३७ ते ४७ योगभ्रष्टाची गति व ध्यानयोगाचा महिमा.

अध्याय ७

| | |
|---|---|
| श्लोक १ ते ७ | विज्ञानरहित ज्ञान. |
| ,, ८ ते १२ | सर्व पदार्थांत कारणपरत्वें परमेश्वर. |
| ,, १३ ते १९ | असुरी स्वभाव व भगवद्भक्त. |
| ,, २० ते २३ | अन्य देवतांची उपासना. |
| ,, २४ ते ३० | भगवंताचा महिमा. त्याला ओळखणारांची व न ओळखणारांची अनुक्रमें स्तुति व निंदा |

अध्याय ८

| | |
|---|---|
| श्लोक १ ते ७ | ब्रह्म, अध्यात्म व कर्म यासंबंधी अर्जुनाचे सात प्रश्न व त्यांचीं उत्तरें. |
| ,, ८ ते २२ | भक्तियोगाचा विषय. |
| ,, २३ ते २८ | शुद्ध व अशुध्द मार्गासंबंधीं |

अध्याय ९

| | |
|---|---|
| श्लोक १ ते ६ | ज्ञान व त्याचा प्रभाव. |
| ,, ७ ते १० | जगदुत्पत्ति |
| ,, ११ ते १५ | असुरांची निंदा व भक्तांची स्तुति. |
| ,, १६ ते १९ | सर्वव्यापी भगवंताचें स्वरूप व प्रभाव. |
| ,, २० ते २५ | सकाम व निष्काम उपासनेचें फल. |
| ,, २६ ते ३४ | निष्काम भगवद्भक्तीचा महिमा. |

अध्याय १०

| | |
|---|---|
| श्लोक १ ते ७ | भगवंताच्या विभूती व योगशक्ती. |
| ,, ८ ते ११ | भक्तियोगाचें फल व प्रभाव. |
| ,, १२ ते १८ | विभूति सांगण्यासाठीं अर्जुनाची प्रार्थना. |
| ,, १९ ते ४२ | विभूति व योगशक्ती यांचें निरूपण. |

अध्याय ११

| | |
|---|---|
| श्लोक १ ते ४ | विश्वरूपदर्शनासाठीं अर्जुनाची प्रार्थना. |
| ,, ५ ते ८ | विश्वरूपाचें भगवन्त वर्णन करतात. |
| ,, ९ ते १४ | धृतराष्ट्रास संजय विश्वरूप सांगतो. |
| ,, १५ ते ३१ | विश्वरूप पाहिल्यावर अर्जुनाची स्तुति |
| ,, ३२ ते ३४ | भगवान् आपला प्रभाव सांगून अर्जुनास युध्दास उत्तेजन देतात. |
| ,, ३५ ते ४६ | भयभीत अर्जुन चतुर्भुजदर्शनाबद्दल परमेश्वराची प्रार्थना करतो. |
| ,, ४७ ते ५० | विश्वरूपाचें महत्त्व व चतुर्भुजदर्शन. |
| ,, ५१ ते ५५ | अनन्यभक्तिवाचून चतुर्भुजदर्शनाची दुर्लभता आणि अनन्यभक्तीचें फल. |

अध्याय १२

| | |
|---|---|
| श्लोक १ ते १२ | साकार व निराकार उपासनेची श्रेष्ठता व भगवत्प्राप्तीचा उपाय. |
| ,, १३ ते २० | भगवत्प्राप्ती झालेल्यांचीं लक्षणें. |

अध्याय १३

| | |
|---|---|
| श्लोक १ ते १८ | ज्ञान व क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ. |
| ,, १९ ते ३४ | ज्ञान, प्रकृति व पुरुष. |

अध्याय १४

| | |
|---|---|
| श्लोक १ ते ४ | ज्ञानमाहिमा, प्रकृति व पुरुषापासून जगदुत्पत्ति |
| ,, ५ ते १८ | सत्त्व, रज, तम हे तीन गुण. |
| ,, १९ ते २७ | भगवत्प्राप्ती व गुणातीताचें लक्षण. |

अध्याय १५

| | |
|---|---|
| श्लोक १ ते ६ | संसारवृक्षाचें वर्णन व भगवत्प्राप्ती. |
| ,, ७ ते ११ | जीवात्मा. |
| ,, १२ ते १५ | परमेश्वराचा प्रभाव व स्वरूप. |
| ,, १६ ते २० | क्षर, अक्षर– पुरुषोत्तम. |

अध्याय १६

| | |
|---|---|
| श्लोक १ ते ५ | दैवी व असुरी संपत्ति व फळें. |
| ,, ६ ते २० | असुरी संपत्तिचे लोक व त्यांची अधोगति. |
| ,, २१ ते २४ | अशास्त्र आचरणाचा निषेध व शास्त्रशुध्द आचरणास उत्तेजन. |

अध्याय १७

| | |
|---|---|
| श्लोक १ ते ६ | श्रध्दा व शास्त्रविपरीत घोर तप. |
| ,, ७ ते २२ | आहार, यज्ञ, तप आणि दान यांचे प्रकार. |
| ,, २३ ते २८ | ॐ तत्सत् ह्मणजे काय ? |

अध्याय १८

| | |
|---|---|
| श्लोक १ ते १२ | त्याग ह्मणजे काय ? |
| ,, १३ ते १८ | कर्माचरणीं सांख्यासिध्दांत. |
| ,, १९ ते ४० | गुणाप्रमाणें ज्ञान, कर्म, कर्ता बुध्दि, धृति. |
| ,, ४१ ते ४८ | वर्णधर्म व त्याचीं फलें. |
| ,, ४९ ते ५५ | ज्ञाननिष्ठा. |
| ,, ५६ ते ६६ | भक्तिसहित कर्मयोग. |
| ,, ६७ ते ७८ | गीतामाहात्म्य. |

# महत्वाच्या टीपा

अध्याय १

| | |
|---|---|
| श्लोक १ | धर्मक्षेत्र= पुण्यशीलतेची भूमी ( कुरुच्या तपाचा उल्लेख शल्यपर्वांत आहे. ) |
| | कुरुक्षेत्र=देवांची यज्ञभूमी ( जढबाल श्रुति ) |
| ,, ३ | द्रुपदपुत्र= द्रोणवधाची प्रतिज्ञा करणारा धृष्टद्युम्न. |
| ,, ४ | महेष्वासा= मोठीं धनुष्यें घेतलेला. |
| ,, ४ | युयुधान= सात्यकी. |
| ,, ७ | संज्ञार्थम्= उगीच माहिती ह्मणून. |

श्लोक ८ सौमदत्ति= भूरिश्रवस्

,, ९ त्यक्तजीवित= ( ओवाळून ) टाकलेला आहे जीव ज्यांनीं; तळहातावर शिरें घेऊन बसलेले.

,, १० अपर्याप्त= अफाट, सर्व प्रकारांनीं अजिंक्य. ( नीलकंठ )

पर्याप्त= मोजकें, जिंकण्यास सुलभ. (नीलकंठ)

,, ११ अयन= मोर्चा.

,, १२ कुरुवृध्दः पितामहः = भीष्म.

,, २२ यावत्= जेथपासून ( स्थलबोधक व काल-बोधक– मधुसुदन )

,, २७ कृपा= करुणा.

,, ३६ आततायिनः = ( वशिष्ट, विष्णु, कात्यायन यांच्या व्याख्या पहा. ) आगलाव्या; उपव्यापि.

,, ३९ ज्ञेयम्= समजावें; विचार करावा.

,, ४१ दुष्ट= दूषित; खालावलेली, ( स्त्रीषु दुष्टासु– डॉ. ब्राईस रोमेनची व्याख्यानें. )

,, ४४ अनियतम्= अनन्तकालपर्यंत.

,, नियतम्= निश्चित.

| | |
|---|---|
| अध्याय २ | |
| श्लोक २ | कश्मलमिदमुपस्थितम्= ही अक्कावाई आठवली. |
| | कश्मलं= पुळचटपणा; पाप. |
| | विषम= आणीबाणीची वेळ. |
| ,, ४ | संख्य= युध्द. |
| ,, ७ | कार्पण्य= दैन्य. ( कृपण= ईश्वराचें ज्ञान झाल्याविना मरणारा–उपनिषद् ) |
| ,, ८ | उच्छोषण= कोरड, ठणठणपाळ, फडशा. |
| ,, ११ | प्रज्ञावाद= शहाणपणाच्या गप्पा. ( शंकराचार्य व रामानुजाचार्य ) |
| | ( गतासूनगतासूं ) च = इव = जसें, ज्याप्रमाणें. ( श्रीमध्व ) |
| ,, १२ | जातु= कोण्याकाळीं. |
| ,, १४ | मात्रास्पर्शा= इंद्रियांचा त्यांच्या त्यांच्या विषयाशीं संयोग. |
| ,, १७ | ततम्= व्यापलेलें. |
| ,, १९ | आश्चर्यवत् पश्यति= आश्चर्यो वक्ता. (कठोपनिषद् २।१७ पहा.) |
| ,, २० | न जायते म्रियते= कठोपनिषद् २।२९ पहा. |
| ,, २८ | परिदेवना= शोक, चिंता, कष्ट. |


श्लोक ३१ धर्म= धारणात् धर्म इत्याहुः धर्मो धारयते प्रजाः । ( महाभारत ) आपण नुसतेच नव्हे तर चांगल्या तऱ्हेनें जगूं शकतो आणि तसे करताना समाजातील तेजस्वी माणसांचीही ज्याच्या योगे प्रतिष्ठा राहते ते ते सर्व.

„ ४१ व्यवसायात्मिका = संपन्न; साक्षात् कर्मकर.

„ ४३ काम = जी वस्तु आपणांजवळ नाहीं, पण जी मिळाल्यापासून सुख होईल असें आपणास वाटते, ती मिळविण्याची उत्कट इच्छा.

„ ४४ समाधि = अक्षय जागृति. फक्त अत्युच्च स्वसंवेदनात्मक कर्म स्फुरण पावते ती स्थिति ( हिलाच ' ब्राह्मी स्थिति ' ह्मणतात ) समाधान. वृत्तिरहित ज्ञान. स्वतांचा स्वतांला विसर पडतो ती ज्ञानतेजाची स्थिति.

गीता-सांख्य-अधुनिकशास्त्रें यांचा मेळ घालणारें कोष्टक.



श्लोक ४४ व ४५

- आत्मा
  - विकारात्मक मन
    - पूर्ण विकारात्मक
      ( यांत केवळ, पोषण-वर्धन-उत्पादनादि जीव-शरीराची सामान्य कर्में घडतात )हिलाच पाशवी, समाजबाह्य, वेड्याची स्थिति ह्मणतां येते. ही वेदरहित, गुणरहित, द्वंद्व-रहित, सत्वरजतमादिभाव-रहित, योगक्षेमभावरहित, आत्मानात्मविचाररहित असते.
    - अपूर्ण विकारात्मक
      किंवा वासनात्मक ( प्रत्यक्ष शरीरसुख तें सत् व दुःख तें असत् अशी भावना असते. )
  - विचारात्मक बुद्धि
    - अपूर्ण विचारात्मक
      ( आप्तवाक्य व धर्मशास्त्र यांच्या आज्ञा श्रद्धेनें पाळून सत्कर्माचरण करणारी बौद्धिक स्थिति )=बहुशाख व्यवसायात्मकबुद्धि (गीता) ही फलेच्छु बुद्धिची स्थिति वेदमय, त्रिगुणान्वित, द्वंद्व-मय, सत्वरजतमयुक्त, योग-क्षेमभावयुक्त, अनात्मवान् असते.
    - पूर्ण विचारात्मक
      ( आत्मानात्म विचार-पर समष्टिरूप स्थिति-ज्ञानाची पूर्णावस्था ) =एकनिष्ठ व्यवसाया-त्मकबुद्धि (गीता) ही निष्काम कर्मयोगाची समाधिस्थिति, वेदा-तीत निस्त्रैगुण्य, निर्द्वंद्व, नित्यसत्वस्थ, निर्योग-क्षेम व आत्मवान् असते.

श्लोक ४७ रजः कर्माणि वर्तते. कर्म

| अनिश्चितकर्म | अनियतकर्म | नियतकर्म | इच्छाशक्तिनें घडणारें कर्म |
|---|---|---|---|
| शरीरांतर्गत, यांत्रिक कीं ज्यावर सर्व इंद्रियांची स्थिति असते. | समष्टीला सोडून असलेले कर्म कीं ज्यांत पूर्ण बंधन असते. | यज्ञार्थकर्म. समष्टीस अवश्य कर्म | बाह्य विषयांना अनुलक्षून इंद्रियांकडून घडणारें कर्म कीं ज्यावर इंद्रियांची व पर्यायानें शरीराची उन्नति होते. |

नियतकर्म:
- फलाशासहित
- मुक्तसंग= फलाशा नसलेले
  - अकुशल
  - कुशल= ब्राह्मी स्थिति, पूर्णकर्मबंधनमोक्ष.

इच्छाशक्तिनें घडणारें कर्म:
- मनप्रेरित= विकारात्मक प्रेरणात्मक
- बुध्दिप्रेरित= बिचारात्मक नियमनात्मक

श्लोक ४८ योग= ( युज्= जोडणें ) वाहून घेणें; एकरूप होणें. " समत्वं योग उच्यते " हें या श्लोकातील आणि श्लोक ५० मधील " योगःकर्मसु कौशलम् " या दोनही वचनाचा समन्वय घालूनच निर्वाह केला पाहिजे. पैकीं दुसऱ्या वचनांत कर्मसु हा शब्द योगः व कौशलम् या शब्दांच्या मधोमध घालून गीताकारांनीं एकपरी बहार केली आहे. कर्मसु योगः कौशलम् ह्मणजे कर्म व आपण एकरूप झालें कीं, कुशलता प्राप्त होते. अशा तऱ्हेनें जगांत चांगल्या तऱ्हेनें जगण्याची किल्ली सांगून (२) कर्मसु कौशलम् योगः ह्मणजे कोणतेही कर्म हातचा मळ होऊन बसलें असतां ' योग ' साधतो. कारण कर्म एकदां हातचा मळ होऊन बसलें ह्मणजेच ' सहज कर्म ' होतें. तें कधींही ताण देत नाहीं. जें कर्म ताण किंवा बोजा वाटत नाहीं, त्याच्या सुखदुःखाची मातब्बरीही मनाला वाटत

नाहीं. करून अकर्तेपणा किंवा खरें नैष्कर्म्य यालाच ह्मणतात. पण मन या अवस्थेला यावयास कर्माला वाहून घ्यावयास– कर्माशीं एकतन्द्र व्हावयास हवें. संवयीशिवाय स्वभाव नाहीं.

,, ५२ (मोह) कलिक= दलदल, चिखल.

,, ६९ जागर्ति= जागा असतो; सर्व संवेदनात्मक कर्में चालत असतात.

सा निशा= उच्च संवेदनात्मक कर्मे बंद पडतात व असंवेदनात्मक कर्मे चालूं असतात ती स्थिती.

अध्याय ३ " जीवन सेवाने सारु छे. भोगने सारु नथी. "

— म. गांधी.

श्लोक ३ निष्ठा= साधनाची परिपक्व अवस्था; पराकाष्ठा; विशेषभक्ति; प्रेम; आवड.

,, ९ यज्ञ= ज्या कर्मांत ज्यास्तीत ज्यास्त जीवांचें ज्यास्तींत ज्यास्त क्षेत्रांत कल्याण आहे, आणि जें कर्म ज्यास्तींत ज्यास्त मनुष्यांचें ज्यास्तींत ज्यास्त सहकार्य करूं शकतें व ज्यामध्यें ज्यास्तीत

ज्यास्त सेवा रुजू होते, तें उत्तमांतील
उत्तम यज्ञ होय. ( गांधी )

श्लोक १८ अर्थव्यपाश्रय= स्वार्थ; गुंतलेला लोभ.

„ ३१ श्रध्दा= (हेतूला धरून आहे व तींत कँटच्या Perfection of will चा समावेश होतो. )

„ ४२ इंद्रियाणि पराण्याहु: = कठोपनिषद्.

अध्याय ४

श्लोक १ योग= हें स्वतंत्रशास्त्र ह्मणून घेतलें तर व्यक्तिविषयक आहे. तें पृथक्करणपद्धतीनें कर्माचें विवेचन करतें.

„ ४ अपर= अधुनिक, अलिकडचा.
पर= प्राचीन, जुना.

„ १० ते २० नैष्कर्म्य याचें व्याख्या- विवरण.

„ अखिल= निर्दोष.

„ १३ चातुवर्ण्य= फ्रेंच मिशनरी अॅबी डुबॉयस यांच्या " हिंदु चालीरीति " या पुस्तकाच्या २८ व्या पानावर असें ह्मटलें आहे कीं:— " हिंदु लोक वर्णव्यवस्थेमुळेंच इतर रास्ट्रांसारखे रानटी अव-

स्थेला न पोहोंचतां, सुधारणु-
कीच्या कला व शास्त्रें जपूं
शकले व पूर्णतेला नेऊं शकले. "
( " ब्राह्मणो ऽस्य मुखम् " हें
सर्व तोलून पहा. )

श्लोक २५ ब्रह्माग्नावपरे.... जुव्हति= ब्रह्माग्नित यज्ञानें
यज्ञ जळतात; पर-
मात्म्याच्या ठिकाणीं
ज्ञानद्वारा एकरूप
होऊन राहणें.

" ३० नियताहार= अ. ६–१७ पहा.

" ३५ येन...... आत्मनिः– अ. ६–२९ पहा.
मयि= अ. ६–३० पहा.

" ३९ संयतेन्दिय= हुकमतीत इंद्रिये राखणारा.
तत्पर= त्या ( ज्ञाना ) ला वाहिलेला.
( तत्परता ही फलाला अनुलक्षून
प्लेटोच्या Contemplation of Good
चा समावेश करते. )

अध्याय ५
श्लोक १

संन्यास= ( सम्= उत्कृष्टपणानें + न्यास= ठेवणें ) मन, इंद्रियें आणि शरीर यांच्या द्वारा होणाऱ्या सर्व कर्मांच्या कर्तेपणांतील अहंभावनेचा त्याग. संन्यासांत कर्मयोगाचा सममाव दृष्टीस पडतो. कोणतेही काम हातावरच्या आवळयासारखें ज्याला झालें, त्याला आपण अमुक एक काम करीत आहे असें सांगतांच येत नाहीं. रोजची दैनंदिनी लिहिणारा अगर सांगणारा प्रातर्विधि अगर उदरंभरण कांहीं वैशिष्टयानें सांगतच नाहीं. इतका आपला आपणाला विसर पडून जेव्हां मनुष्याच्या हातून घडयाळाच्या चक्रासारखें काम घडतें, तेव्हांच संन्यास त्याच्या ठिकाणीं मुरला असें होतें. सूर्य रोज उगवतो व मावळतो. आपलें आपण काय करतों आहोंत याची जाणीवही

त्यास नाहीं. प्रवाहपतितासारखा तो वरबध्या दृष्टीस दिसतो. पण खरोखर रोगाचें नाशन– नवजीवनाचा संचार, अभिनव चित्रलेखा सूर्याच्या दैनंदिन गतीनें आपोआप होत असतात. खरा संन्यास असा असतो. लौकिकांतील संन्यासाश्रमाची कल्पनादेखील " आधीं प्रपंच करावा नेटका । मग पहावें परमार्थविवेका " अशीच आहे. ज्याला प्रपंच करणें ह्मणजे कांहींच नाहीं, अगदींच फुसकी गोष्ट आहे असें होतें आणि म्हणून जो त्या प्रपंचाला व्यवस्थित ठेवून ( टाकून नव्हे ) पुढें जातो तो संन्यासी.

श्लोक १६ ज्ञान= हें बुध्दिगम्य आहे.

,, १८ पंडित= आत्मज्ञान झालेला. (पंडा=आत्मज्ञान)

,, १८ समदर्शिन= अ. ६–३२ पहा.

,, २८ मुनि= परमेश्वरस्वरूपाचें सतत मनन करणारा

अध्याय ६

श्लोक १ निरग्नि: = निर्यज्ञ, अग्निपूजा टाकणारा.
आक्रिय: = निष्क्रीय, स्वस्थ बसणारा.

" २ योग= अ. ३–३ तोलून पहा.

" ३ आरुरुक्षु: = चढू पहाणारा.

" ८ ज्ञानविज्ञानतृप्तात्मा= तो पुरुष कीं ज्याला व्यष्टी व समष्टी एकरूप झालेली असते.

" ३० यो मां...... पश्यति= अ. ९–६ पहा.

" ३१ वर्तमान= असणारा, वागणारा, आचरणारा.

" ३५ अभ्यास= अ. १२–९ तोलून पहा.

अध्याय ७

श्लोक १२ अ. ९–४।५ तोलून पहा.

श्लोक १४ प्रकृति= ( प्र + कृति ) अखंड कर्म. सत्त्व-रज-तम या त्रिगुणांनीं युक्त असते. तिचा व्याप—

प्रकृति

|

महातत्त्व- ज्ञानतत्त्व

|

अहंकार- व्यक्तितत्त्व

|

भूतें.

श्लोक १५ माया= विश्व कसें चाललें आहे याचें वस्तु-स्थितिनिदर्शक वर्णन. १ काळ, स्थळ, आणि कारणपरंपरा ( कार्य-कारणभाव ) यांनीं मर्यादित प्रत्येक वस्तु ( विवेकानन्द )

,, २१ तनु= प्रतीक, मूर्ति.

अध्याय ८

श्लोक ४ पुरुष=सूत्रात्मा, हिरण्यगर्भ असें ज्याला शास्त्रें ह्मणत असतात तो. याला प्रजापति, ब्रह्मा असेंही ह्मणतात.

,, ९ अनुशासितृ=नियमन करणारा; अंतर्यामीं राहून शुभाशुभ कर्माप्रमाणें वळण देणारा.

,, ११ यदिच्छन्तो ब्रह्मचर्यं चरंति= कठोपनिषद् २।१५ पहा.

श्लोक २२ यस्यांतस्थानि भूतानि=अ. ९-४ पहा.

अनन्यभाक्ति=अ. ११-५५ पहा.

,, २३ काल=मार्ग (पुढील श्लोकांतून)

स्मृति (८-२७) व गति (८-२६)

,, २६ एकया यात्यनावृत्तिं=अ. ८-२४ पहा.

अन्यया वर्तते पुनः =अ. ८-२५ पहा.

अध्याय ९

श्लोक २ राजविद्या राजगुह्य– ब्रह्मानंदगिरी व्याख्ये-प्रमाणें राजशास्त्र व समाजशास्त्र. स्मृतिप्रणित आचारधर्म अथवा कायदा आणि माणसामाणसानें एकमेकाशी वागण्याचे संकेत.

,, ९ उदासीन–ज्याची सगळीं कार्यें याच्या स्वतांच्या कर्तेपणावाचूनच केवळ सत्ता मात्रेंकरून–वजनावर चाललीं आहेत असा.

,, १० अध्यक्ष–साक्षी, भोंग्या.

,, ११ परं भावं मम–अ. ७-२४ पहा.

मानुषी तनु–समाजाचा विस्तार.

,, १२ राक्षसी...श्रिताः – अ. १६-४ व अ. ७-२१

,, १३ दैवी प्रवृत्ति– अ. १६-१ ते ३ पहा.

,, १५ एकत्वेन– सर्व समाज एकजिनसी या बुध्दीने.

पृथक्त्वेन– प्रत्येक व्यक्ति निरनिराळी या दृष्टीनें.
विश्वतोमुखम्–समाज अनंत संघात्मक आहे या दृष्टीनें.

श्लोक १६ ऋतुः – संकल्प
स्वधा– स्वावलंबन.

,, १७ वेद्य– जाणण्यास योग्य ( अ. १३-१२ ते १७ पहा, )

,, १८ निधान– प्रलयकालीं जें जें कांहीं 'झालें' होतें तें तें सर्व जेथें समाविष्ठ होतें तें. २ ठेवा.

,, २२ नित्याभियुक्त– समष्टीरूप झालेली व्यक्ति; समाजाच्या हिताहिताला वाहिलेली व्यक्ति.

,, २२ योगक्षेम– भगवत्स्वरूपाची प्राप्ती व तिच्या साधनाचें रक्षण.

,, २५ यान्ति मद्याजिनोऽपि माम्– अ. ८-१६पहा.

,, ३०-३१ सदुराचारः सम्यक् व्यवसितः – 'आचार' जसजसा जुना होतो तसतसा रूढ होऊन 'महता कालेन' नष्ट होतो. म्हणजे त्यातील धर्मत्व नाहींसे होते. अर्थात् स्वताच्या व समाजातील तेजस्वी माणसांच्या निकोप जीवनाला पोषक होण्याचे

सामर्थ्य आचारातून गेल्यावर ती ग्लानि घालविण्यासाठीं तो रूढ आचार समाजाच्या तेजस्वितेसाठींच मोडणारा सेवक.

अध्याय १०

श्लोक ९ मच्चित्त= माझ्यावर मन असलेले.

मद्‌गतप्राण= माझ्यावर जीव असलेले; परमेश्वरमय जीवन समजणारे.

,, १४ न हि... दानवा: = अ- ४—६ पहा.

,, ३७ उशना: कवि: = शुक्राचार्य.

,, ४० नान्तोऽस्ति मम= तोलून पहा— " एकमेवाद्वितीयं ब्रह्म " व " एकं सद्विप्रा बहुधा वदन्ति, अग्निं यमं मातरिश्वानमाहु: " अ.१,१६४,३६

अध्याय ११ अग्निर्मुधा चक्षुषि चन्द्रसूर्यौ ( कठोपनिषद् )

श्लोक ९ ते १३ व १५ ते २४ यांतील विश्वरूपदर्शनाचे वेळचें परमेश्वराचें वर्णन समष्टीच्या स्वरूपाचें आहे.

,, ४२ असत्कृतोऽसि= अवमानिला गेलास.

,, ४४ रूप चतुर्भुज= चातुर्वण्यात्मक समाज.

,, ५४ अनन्य भक्ति= अ. ११—५५ पहा.

भक्ति= हा अन्त:करणाचा भाव आहे.

अध्याय १२

श्लोक २ — नित्ययुक्ता उपासते= अ. ११–५५ प्रमाणें.

„ ५ ते ८ — कर्म, ज्ञान, योग व भक्ति हे चार ईश्वर-प्राप्तीचे मार्ग सारखेच सत्य आहेत. तथापि इतर मार्गांच्या मानानें भक्तिमार्ग सुलभ व श्रेष्ठ असल्यामुळें त्याचाच सर्वांनी स्वीकार करावा.

„ ११ — सर्व-कर्म-फलत्याग—अ. ९-२७ पहा.

„ १५ — अमर्ष– दुसऱ्याचें चांगलें न बघवणें.

„ १६ — शुचिः – अ. १३-७ पहा.

„ १६ — सर्वारंभपरित्यागी– ज्यानें सर्व उद्योग सोडले आहेत; ज्याचीं सारीं कामें प्रवाह-प्राप्त आहेत; ज्याचीं सारीं कामें ईश्वरीं संकेतामुळेंच प्राप्त झालेलीं असतात. ( म. गांधी )

अध्याय १३

श्लोक १ — इदं शरीरं... धीयते– शेतांत पेरलेल्या बीजाप्रमाणें कर्माच्या संसाराचीही गत शरीरांत होत असल्याकारणानें तें " क्षेत्र. "

„ २ — क्षेत्रज्ञं... विद्धि– अ. १५-७ पहा.

क्षेत्रक्षेत्रज्ञयोर्ज्ञानं– अ. १३–२३ पहा.

,, ३ समासेन– संक्षेपानें, थोडयांत.

,, ६ चेतना– शरीर व अन्तःकरण यांचें चैतन्य.

धृतिः – अ. १८-३३ ते ३५ पहा.

,, ७ शौचं– आंतील व बाहेरील स्वच्छता.

,, १० अव्यभिचारिणी भक्ति– केवळ एक सर्वशक्तिमान परमेश्वरच आपला सर्वस्वी धनी आहे असें मानून चालणारी वृत्ति.

विविक्तदेशसेवित्वम्– एकान्ताविषयीं आवड.

,, १७ ज्योतिषामपि तज्ज्योतिः – अ. १५-१२ पहा.

,, १८ क्षेत्र– अ. १३-५।६ पहा.

ज्ञान– अ. १३-७ ते ११ पहा.

ज्ञेय– अ. १३-१२ ते १७ पहा.

,, २० कार्य– पंचमहाभूतें व त्रिगुण यांस काम.

करण– बुध्दि, अहंकार आणि मन, त्वचा, जीभ, डोळे, नाक, तोंड, हात, पाय, गुदद्वार, कान. हीं १३ करणें.

प्रकृतिः – अ. ७–१४ मध्यें सांगितलेली भगवन्तांची त्रिगुणमयी माया.

,, २४ ध्यान– अ. ६–११ ते ३२ पहा.

सांख्य– अ. २-११ ते ३० पहा.

| | |
|---|---|
| | योग– अ. २-४० ते ७२ पहा. |
| श्लोक २४–२५ | – कर्म, ज्ञान, योग व भक्ति असे चार ईश्वर-प्राप्तीचे मार्ग आहेत. त्यापैकीं जो ज्याला सुलभ व प्रिय असेल तोच त्यानें स्वीकारून कृतार्थ व्हावें. |
| अध्याय १४ | |
| श्लोक ३ | योनिः – क्षेत्र. |
| ,, ४ | प्रकाशकम्– ज्ञान वाढविणारें. |
| | अनामयम्– आरोग्यप्रद. |
| ,, ५ | सत्त्वम्– नियमन; २ रज व तम यांचा समतोल. (विवेकानन्द) ३ बुद्धिसंचालक. |
| | रजः – चलन, हालचाल. २ परतवणी, ३ विकारोद्बोधक. ( विवेकानन्द ) |
| | तमः – अंधार. २ अकर्तृत्व, चलनाचा अभाव ३ मोह (विवेकानन्द) ४ मांद्यजनक. |
| ,, ११ | सर्वद्वारेषु– अन्तःकरणादि इंद्रियांच्या ठायीं. |
| | प्रकाश उपजायते ज्ञानं – प्रज्ञेचा प्रकाश पसरतो; चेतना आणि बोधशक्ति उत्पन्न होते. |
| ,, १७ | प्रमादमोहौ– अ. १४ - १३ पहा. |
| ,, १८ | जघन्यगुणवृत्तिस्था– हीनवृत्तींत वागणारे. |

श्लोक १९ द्रष्टा– देखणा; सार्वत्रिक चैतन्यांत एकरूपानें राहिलेला साक्षी पुरुष.

अनुपश्यति – ओळखतो.

,, २३ गुणा वर्तन्ते– अ. १४–१९ पहा.

अध्याय १५ अर्ध्वमूलोऽवाक्शाख एषोऽत्वधः – सनातनः

( कठोपनिषद् )

श्लोक ३ असंग– वैराग्य.

,, ४ प्रसृता– विस्तारली; स्फुरली.

,, ५ अध्यात्मनित्य– आत्मनिष्ठ; परमात्मस्वरूपात एक होऊन गेलेला.

अमूढ– ज्ञानी, प्राज्ञ.

,, ६ भासयते– उजळतो; प्रकाशित करतो.

धाम परमं– अ. ८–२१ पहा.

,, ११ अकृतात्मानो– अशुद्धात्मे.

,, १३ ओजस्– आकर्षण-बळ.

गाम्– पृथ्वीला.

,, १४ चतुर्विधं अन्नम्– भक्ष्य, भोज्य, लेह्य, चोष्य.

,, १५ अपोहनं– विवेक; बुद्धितील संशय वा विपर्यास विचारानें काढून टाकणें.

वेदान्तकृत्– वेदान्तरहस्यकर्ता.

श्लोक १६ — द्वाविमौ.... एवच– नाशवान आणि अविनाशी असे दोन प्रकारचे या संसारांत पुरुष आहेत. ( अ. ७·४।५ मध्यें अपरा व परा प्रकृती म्हणून त्याचप्रमाणें अ. १३-१ त क्षेत्र-क्षेत्रज्ञ म्हणून ज्यास संबोधिलें तेच ) प्रथम बाह्यसृष्टीचा विचार करून तिच्या बुडाशीं काय तत्त्व आहे हें ठरवावयाचें, यास क्षराक्षर विचार ह्मणतात.

अध्याय १६

श्लोक १ — ज्ञानयोगव्यवस्थिति– ज्ञान आणि योग यांचा समन्वय.

दानं– अ. १७-२० पहा.

„ १० — गृहित्वासद्ग्राहान्– खोटे सिद्धांत उचलून.

„ १७ — आत्मसंभावित– लब्धप्रातिष्ठित; घमेंडखोर.

नामयज्ञ– नांवाचे यज्ञ, नांवापुरते यज्ञ, यज्ञाचे ढोंग.

अध्याय १७

श्लोक ३ — सत्त्वानुरूपा– स्व-भावाला शोभेलशी; जसें अन्तःकरण तशी.

„ ८ — स्थिर आहार– ज्याचा रस पुष्कळ काळपर्यंत

शरीरांत राहतो तो

श्लोक २४ ब्रह्मवादिन्– वेदांचें रहस्य सांगणारा श्रेष्ठ.

अध्याय १८

श्लोक ७ नियतं कर्म– अ. ८-४८ पहा.

,, १६ अकृतबुद्धित्वात्– संस्कार नसल्यामुळें.

,, २५ अनुबन्धः – साहजिक होणारा ठराविक परिणाम, निष्पत्ति.

क्षय– वेंच, हानि.

हिंसा– विनाश.

,, २८ अयुक्तः – अनेक विक्षेप मनांत असणारा.

स्तब्ध– घमण्डी.

नैष्कृतिक– दुसऱ्यांच्या जीवितसाधनांचा नाश करणारा; रडविणारा.

,, ३० प्रवृत्तिः – कर्मयोग. ( जनकादिकांचा )

निवृत्तिः – सांख्ययोग. ( शुकसनकांचा )

मोक्ष– परमतत्त्वाचें अनुभवात्मक ज्ञान होऊन बुद्धि आत्मनिष्ठ, ब्रह्मनिष्ठ, सर्वाभूतीं सम व शांत होणें. ही एक विशिष्ट प्रकारची अध्यात्मिक मनोऽवस्था होय. " मोक्षस्य न हि वासोऽस्ति न ग्रामान्तरमेव वा । अज्ञानग्रंथिनाशो मोक्ष

इति स्मृतः " ( शिवगीता. )

„ ३१ अयथावत्– चोखपणानें नव्हे असें; इतकेच आणि या तऱ्हेनें, व याच्यापुढेंमागें किंवा अन्यतऱ्हेनें नव्हे, असें पृथक्करण करणारें रेषासूक्ष्मत्व नसल्यानें.

„ ३४ प्रसंगेन– सोय पाहून

„ ४५ स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः – तोलून पहा Within the limits every man has it in his power to make of his life so harnonious a whole, that whether it be magnificent or modest, it will be Perfect of its kind— **गटे.**

„ ५१ ते ५४ –तर्कजालांतून सुटून शुद्ध भावानें ज्याची बुद्धि ईश्वरप्रेमी झाली; २ ज्याच्या धारणेंत एका भगवंताविना विषय नाहीं, ३ ज्यानें अंतःकरण ताब्यात ठेवले आहे ४ पांच इंद्रियांच्या पांच विषयांवर आसक्त नाहीं. ५ रागद्वेष ज्यानें राख करून टाकले आहेत ६ ईश्वरी साधनासाठीं जो एकांतवास करतो. ७ केवळ शरीरक्षणापुरतेंच जो जेवण करतो ८ मन, वाणी शरीर ज्यानें जिंकली आहेत. ९ ऐहिक व पारमार्थिक

वैभवाचें ज्याला वैराग्य असते. १० जो परमेश्वराच्या ध्यानांत नेहमीं निमग्न असतो. ११ अहंकार, बल, घमेंड, कामक्रोध वगैरे दुर्गुण ज्यानें टाकले आहेत १२ जो आसक्तीनें भोगासाठीं कोणत्याही वस्तूचा संग्रह करीत नाहीं १३ ज्याला जगांतील वस्तूंत स्वतंत्रपणें ' आपलेंपण ' उरलें नाहीं. १४ ज्याच्या अन्तःकरणाची चंचलता नष्ट होऊन गेली आहे. १५ ज्याने सच्चिदानन्दघन ब्रह्मांत लीन होण्याची योग्यता प्राप्त करून घेतली आहे. १६ जो ब्रह्माच्या ठिकाणींच स्वतांला अस्तित्वरूपानें जाणत असतो. १७ जो सदा प्रसन्नहृदय असतो. १८ जो कोणत्याही गोष्टीचा शोक करीत नाहीं. १९ ज्याच्या मनांत कोणत्याही पदार्थाची आकांक्षा नाहीं. २० जो सर्वभूतांच्या ठिकाणीं समभावानें आत्मरूप परमेश्वराला पाहतो.

,, ५४ समः ... भूतेषु— अ. ६-२९ पहा.

पराभक्तिः — ज्ञानाची परमनिष्ठा.

,, ५७ चेतसा... संन्नस्य— अ. ९-२७ पहा.

,, ७० ज्ञानयज्ञेन— अ. ४-३३ पहा.

---

# गीतेचें आकर्षण.

गीतेंत भक्तियोगाचा उल्लेख ४ थ्या अध्यायांत आहे. ( श्रद्धावान् लभते ज्ञानम् ) अध्याय ७ ते १७ अखेर भक्तियुक्त ज्ञानविज्ञान वर्णिलें आहे. अध्याय ९।१०।११।१२ हे त्यांतल्या त्यांत भक्तिपर आहेत. पण त्यांतही ज्ञान-कर्मयोगाचा धागा कायम राखला आहे. आतां ६ व्या अध्यायांत पातंजल-योग आहे खरा; पण या सर्व अनुषंगिक गोष्टींचा हेतु कर्मयोगाची निष्कामबुद्धि साधण्याचा आहे. पातंजल—योगापेक्षां अध्यात्माचिंतन व अध्यात्मचिंतनापेक्षांही भक्ति ही सुलभ व महत्वाचें साधन आहे. अध्यात्माच्या दृष्टीनें कापिल-सांख्यशास्त्राप्रमाणें अध्याय ७।८।९ व पुढें १४ ते १७ तील वर्णनें पाहण्यासारखीं आहेत. त्रिगुणात्मक प्रकृतीचें वर्णन अध्याय ७ व १४ असें दोन वेळ आलें आहे. तर स्थितप्रज्ञ, भगवद्भक्त, त्रिगुणातीत अगर ब्रह्मभूत म्हणून चार वेळ ' समाधिस्था ' चे वर्णन आलें आहे.

अभ्यासदृष्टीनें गीतेचें असें पृथकरण करतांना, वांग्मयाच्या नि काव्याच्या दृष्टीनें मनोरम स्थळें आढळतात तीं अशीं:—

| | | |
|---|---|---|
| १ ल्या | अध्यायांतील | अर्जुनाच्या आत्मस्थितीचें वर्णन नि युद्ध न करण्याची कारणपरंपरा. |
| २ ऱ्या | अध्यायांतील | स्थितप्रज्ञाचें वर्णन. |
| ३ ऱ्या | ,, | यज्ञचक्राचें वर्णन. |
| ९ व १२व्या | ,, | भक्ताचें वर्णन. |
| ११ व्या | ,, | विश्वरूपदर्शन. |
| १४ व्या | ,, | गुणातीताचें वर्णन. |
| १६ व्या | ,, | असुरी संपत्तिचे वर्णन. |

# गीताधर्मप्रवेश.

## गीतेचें काल-महात्म्य.

महाभारत या महाकाव्याचा गीता हा एक भाग आहे. भीष्मपर्वांत तो आला आहे. महाभारताचा कर्ता श्रीवेदव्यास ह्मणून प्रसिद्ध असलेला श्रीबादरायण असल्याकारणानें गीतेचाही कर्ता तोच होय. वेदव्यास हा विष्णूचा अवतार होय, असें हिंदू समजत. व्यास हा अवतार नव्हे, तो एक महर्षि होता व इतरांप्रमाणेंच त्यालाही प्रारब्ध होतें असें वेदान्तदेशिकारांनीं मत दिलें आहे. उलट मध्वाचार्य आणि शंकरानुयायी त्याला अवतार मानतात. ( शारीरिक मीमांसा व आनंद प्रेसची भगवद्गीतावृत्तीची प्रस्तावना पहा. ) व्यास अवतार माना कीं न माना, " मुनीनामप्यहं व्यासः " असें उद्गार श्रीकृष्णाच्या तोंडीं ' विभूतियोगांत ' ( १०-३७ ) घालून व्यासानें आत्मविश्वासपूर्वक आपली योग्यता बरीक प्रगट केली आहे. परमेश्वराचा पूर्णावतार समजलेल्या श्रीकृष्णाच्या तोंडीची आपली योग्यता आत्मविश्वासानें प्रगट करणाऱ्या व्यासानें आपल्या जीवितसारतत्त्वज्ञानाची शिकवण देणाऱ्या ग्रंथाची ह्मणजे गीतेची भूमिका धृतराष्ट्राच्या संजयास केलेल्या प्रश्नानें सूचित केली आहे. दहा दिवस रणांगण लढविणारा भीष्म पडल्याची बातमी संजयानें दिल्यावर धृतराष्ट्रानें विचारलें, " रणांगणाची वार्ता काय आहे ? " आणि संजयानें जी रणवर्ण-

नाला सुरवात केली, त्या ओघांत व्यासानीं गीतेचा अवतार साधला आहे.

संजय हा मोठा अधिकारी पुरुष होता. तो सारथी होता खरा; पण धृतराष्ट्रासारख्या सार्वभौमाच्या तोंडावरही स्पष्ट स्पष्ट बोलण्याला तो कमी करीत नसे. भारतीय युद्ध अपरिहार्य आहे असें ठरल्यावर, त्या युध्दाची दैनंदिनी ऐकावयास उत्सुक अशा धृतराष्ट्राला रणांगणीची बारीकसारीक देखील माहिती पुरवण्याच्या उद्देशानें व्यासानें संजयास दिव्य दृष्टी देऊन त्याची योजना धृतराष्ट्राजवळ केली. त्या योजनेप्रमाणें भगवद्गीता ह्मणजे कुरुक्षेत्रावर श्रीकृष्णांनीं अर्जुनाला जो पौरुषत्वाचा उपदेश केला त्याचा संजयानें धृतराष्ट्राला सादर केलेला वृत्तान्त होय. तात्पर्य, जीवितशास्त्राचा सिध्दांत ह्मणून व्यासाला ज्या तत्वज्ञानाचा उठाव करावयाचा होता, त्याचा उगम श्रीकृष्णाच्या तोंडून करवून संजयाच्या मुखानें तें धृतराष्ट्राच्या कर्णद्वारा जगत्सागरापर्यंत व्यासानें आणून सोडलें आहे. आणि जास्तींत जास्त ७००० वर्षें झालीं म्हणा वा कमींतकमी ३१०० वर्षें आज झालीं म्हणा, भगवद्गीतांतर्गत जीवितशास्त्रानें काळाला पुरून उरणाऱ्या मतिमतंगजाला वेडे करून सोडलें आहे वेडे !

मॅक्समुल्लर, वेबर, मॅकडोनल, प्रा. ल्यासन इत्यादि वैदिक वाग्मयोपासक मंडळींच्या लेखांवरून अनुमान केलें तरी गीतेच्या चवथ्या अध्यायांत उल्लेख केलेल्या विवस्वानापासून श्रीकृष्णापर्यंत पंधरा पिढया मोजतां येतात; इतकेंच नव्हे, तर मॅगॅस्थेनिसच्या लेखावरून सायणनिरयनगणितावरून, भागवत–विष्णुपुराण यांच्यावरून, किंव-

हुना कल्हण आर्यभट्ट यांच्या लिखाणांवरून, चिंतामणराव वैद्य-लोकमान्य- अय्यर-लेले-दीक्षित-मोडक यांनीं गीतेचा काल खिस्तीशकापूर्वी अनुक्रमें ५००० वर्षें, ३१०० वर्षे व १५०० ते १२०० वर्षे असल्याचें सांगितलें आहे. शक किंवा म्लेंछ राजे यांनीं भारतीय युद्धांत कोणत्या तरी एका पक्षास सहाय्य केल्याचें भारतांत वर्णन आहे. पण या अवैदिक धर्मांच्या राजांचा हिंदुस्थानच्या कोणत्याही भागावर त्या वेळीं अंमल चालूं झाला नव्हता. वैदिक धर्मांचेच त्या वेळीं आसेतुहिमाचल प्राबल्य होतें. भारत वर्षांतील निरनिराळ्या प्रांतात निरनिराळे राजे राज्य करीत होते. परंतु धर्मदृष्ट्या एक होते. अशा परिस्थितींत एकाद्या प्रांताचा राजा पराक्रमी निघून तो आसपासच्या बऱ्याच राजांचा पराभव करून त्यांस मांडलीक करी व आपण सार्वभौम होई. पण हा सार्वभौमपणा मांडलिकांकडून कर घेण्यापुरताच अमलांत येत असे. अशा स्थितींत राष्ट्रांतील पुढारी पुरुषाचें कर्तव्य अर्थातच एक परी– स्वधर्मरक्षण तर दुसऱ्या परी, देशांतच आपल्याच धर्माचे कोणी जर दुष्ट पुरुष किंवा राजे निर्माण झाले तर त्यांचा क्षय करून पुन्हां धार्मिक व सामाजिक निर्बंध पूर्ववत् करून लोकांस सुखी ठेवावें, एवढेंच मानले गेले असलें तर नवल काय? ( ‘ यदा यदा हि धर्मस्य ’ वगैरे ४ थे अध्यायातील दोन श्लोकांत गीताकालाचें एका अर्थानें प्रतिबिंबच आहे. )

भारतवर्षाच्या अशा एका काळापासून आजतागायत गीतेनें बुद्धिमंतांच्या बुद्धिमंताना वेड लावलें आहे; आणि जगांतील नव्या

वातावरणाचा कयास बांधण्यांत अदूरदृष्टी होत नसेल, तर गीताधर्म हाच जागतिक धर्म होणार आहे अशी अटकळ बांधण्यास सबळ जागा आहे. पुढच्या या गोष्टी किंचित् बाजूस सारून गीता-कमला वरील आजपर्यंतच्या गुंजारवाकडे पाहिलें तरी अक्कल गुंग होऊन जाण्याची पाळी येते. अद्वैतवादी शंकराचार्य, विशिष्ठाद्वैती रामानुजाचार्य, विशुद्धाद्वैती वल्लभाचार्य, द्वैतवादी मध्वाचार्य, द्वैताद्वैतवादी निंबार्काचार्य हे जुने; आणि हिरेंद्रनाथ दत्त, अरविंद घोष हे आधुनिक भाष्यकार गीतेचें सर्वव्यापकत्व उत्तम तऱ्हेने प्रगट करतात. " ज्ञान, कर्म आणि भक्ति यांच्या मेळाचा अपूर्व धर्म गीतेमध्येंच दृष्टिगोचर होतो. " असे उद्गार बंकीमबाबूंनीं काढले तर एक परी अनैसर्गिक कांहीं नाहीं. कारण अकबराचा प्रपौत्र दारा शिकोह असें जाहीर करतो कीं " गीताग्रंथ आनंद देणारा, खरा मार्ग दाखविणारा, ब्रह्मज्ञानामध्यें भरपूर, परस्परविरोधी भेद समजाविणारा, व त्यांची एकरूपता दाखवणारा आणि सगळया ज्ञात्यांचा शिरोमणि महर्षि व्यास यानें रचलेला आहे. याचें पुरें वर्णन करणेंची शक्ती माझ्या जिभेंत अगर कलमांत नाहीं. " त्याचप्रमाणें वॉरन हेस्टिंग्ज अशी ग्वाही देतो कीं " कोणत्याही जातीला उन्नतीच्या शिखरावर चढावयास गीतेचा उपदेश अद्वितीय आहे. "

आणि इमर्सन तर छातिठोक सांगतो कीं " सर्व विश्वाच्या साहित्यांत सर्वोत्तम ग्रंथ, मानवतेच्या चिंतनाची सर्वश्रेष्ठ सामग्री त्याचप्रमाणें अनुभवाची सर्वांत श्रेष्ठ संपत्ति गीता होय. " अशाही

आख्यायिका प्रसिद्ध आहेत कीं, " सर्वभूतेषु चात्मानं सर्वभूतानि चात्मनि " या श्लोकानें ज्याप्रमाणें इमर्सनला नुसतें वेडे केले होतें त्याचप्रमाणें गीतेच्या चिनी भाषांतरकाराला गीतेंतील ज्ञानाच्या योगानें दिवसाकाठीं चार वेळ आनंदाश्रु गाळल्याशिवाय राहवत नसे. फार काय, गीतेचें भाषांतर फारशींत केल्याशिवाय फैजिला, अरबींत अबुसुलेहास, लॅटिनमध्यें स्लेगनास, ग्रीकमध्यें डिमिस्ट्रिअस यास, फ्रेंचमध्यें बर्नुफास, जर्मनींत लॉरिंजरास, इटालींत स्तानिसल समेटिआ याला, इंग्रजींत टॉम्सन्—आर्नोल्ड-डेव्हिड—चार्लस् विल्किन्सन् यांस राहवलेंच नाहीं.

" बुद्धिची प्रखरता, आचाराची उत्कृष्टता आणि धार्मिक उत्साहाची संवर्धनसमर्थता गीता उत्कृष्ट साधते " असा मनमोकळा अभिप्राय जेथें डॉ. मॅकानिकल प्रगट करतो आणि जेथें एफ्. टी. ब्रुक्स तुतारी फुकतो कीं, " राष्ट्रीय धर्मग्रंथ मानावयास ज्या गुणांची आवश्यकता असते, ते सर्व गीतेमध्यें आहेतच; पण गीता हा विश्वधर्माचा सर्वोत्कृष्ट ग्रंथ होय. " तेथें, गीतेमुळेंच अमेरिकेंतील कॉर्नकॉट मुव्हमेंट जन्म पावली असा घोष इतिहासानें केला व महात्माजींचें चरित्र लिहिणाऱ्या रोमाँरोला या आंतराष्ट्रीय विचारप्रवर्तकाला गीताधर्मच जागतिक धर्म ह्मणून पसन्त पडला तर चमत्कारिक कांहींच नाहीं. पाश्चिमात्य तत्त्वज्ञानाच्या नि मानवी उत्क्रांतिवादाच्या अन्तीम पारसीमेवर गीताधर्माच्या तत्वज्ञानाचा आणि मानवी उत्क्रांतिवादाचा आरंभ आहे असें नीत्सेला बेंबीच्या देठापासून वाटते

हें ज्यांच्या लक्षांत असेल त्यांना इमर्सनचा गुरु थोरो गीतेच्या भजनीं देहभान विसरून गेला होता, हें नव्यानें सांगण्याची आवश्यकता नाहीं. अर्थातच, गीतेवर कबीरानें दोहरे केले; उद्धवचिद्‌घनांनीं सवाया रचल्या; मोरोपन्तांनीं आर्या तयार केल्या; वामनपंडितांनीं समश्लोकी व यथार्थदीपिका प्रज्वळिल्या; तुकारामानीं अभंग उभारले; मुक्तेश्वरांनीं ओव्या गायल्या; ज्ञानेश्वरानीं भावार्थदीपिका तेवत ठेवली; बिनोबाजी भावे नि मुकुन्दराय मिरजकर यांनीं समवृत्तें चितारलीं; अनन्ततनयांनीं वृत्तवैचित्र्याचें रूपांतर सादरिलें; राघवेंद्रस्वामींची गीतानिवृत्ती, मधुसूदनसरस्वती–शंकरानन्द–नीलकंठ–श्रीधर–अभिनवगुप्ताचार्य–वेंकटनाथाचार्य–ब्रह्मानन्दगिरी यांचीं गीतेवरील प्रवचनें अभ्यासून डॉ. बेझंट गीतेच्या टिपणीकार झाल्या; लोकमान्यानीं कर्मयोगशास्त्र प्रवर्तलें; डॉ. कुर्तकोटींनीं ‘ राजयोगराजगुह्य ’ हा परीस अमेरिकेंत चमकाविला; महात्मा गांधींनी अनासक्ति योग गाजविला अगर सेनापति बापटांनी ‘ खलहिंसायोग ’ सजविला तर श्रीकृष्णाची परंपरा सांगणाऱ्या भारतीयांना अभिमानाबरोबर विनयभाव निर्माण होऊन गीतेच्या अन्तरंगाचें सेवन करण्याचा मोह अनावर होतो. कारण के. कृष्णस्वामी राव यांनीं निर्वाळा दिल्याप्रमाणें “ जीविताच्या सर्व अवस्थांमध्यें कर्तव्याचें सर्वोत्तम स्वरूप गीता उपदेशिते ”.

---

# २ गीतेचें ओझरतें दर्शन.

गीताधर्म हाच जगाचा धर्म आहे अशी प्रा. रामकृष्णन् यांना घोषणा करतांना पाहिलें ह्मणजे एकेकाळीं रोमनांचे नांव ऐकतांच जशा युरोपच्या सर्व जाती मांजरीच्या पिलांप्रमाणें पोटाशीं पाय धरून बसत, एकेकाळीं बॅबिलोनियाच्या भीतीनें जसा युरोप थरथर कांपे, एकाकाळीं इजिप्शियनांचा दरारा जसा युरोप-आशिया-आफ्रिका या खंडांतून होता, तद्वत् (स्वामी विवेकानन्दांसारख्यांनीं ह्मटल्याप्रमाणें) गीताधर्माचा प्रसार सशास्त्र केल्यास मानव्याच्या अन्तापर्यंत जगावर गीताधर्मच तेवढा धार्मिक सार्वभौमत्व गाजवील, असा विश्वास वाटूं लागतो. कारण गीतेच्या काव्यमाधुर्यावर कविजन विमुग्ध आहेत, गीतेच्या नीतिशास्त्रावर मी मी ह्मणणारे नीतिज्ञ भूलून गेले आहेत, आणि गीतेच्या वीरवाणीवर दृढप्रतिज्ञ मानव आसक्त आहेत. कवि, नीतिज्ञ व वीर हेच जगाचें तीनचतुर्थांश जीवन संचलित करीत असतात.

तथापि " या कलियुगामाजीं । जो तो गीतार्थ योजी । स्वमतानुसार " हें वामन पंडितांचें वचन व्यर्थ नाहीं हें कबूल करावेंच लागेल. गीतेंत सर्व वेदोपनिषदांचें सारसर्वस्व आहे; गीतेची भाषा संस्कृत असून ती साधारणतः इतकी सरळ व सुन्दर आहे कीं, थोडयाच अभ्यासानेंही ती समजते; गीता स्त्री-वैश्य-शूद्र-पापयोनि यांच्याही उद्धाराचें साधन आहे. (अ. ९-३२ पहा.) कारण स्वाभाविक कर्मानें परमसिद्धि प्राप्त होते (अ. १८-४६ पहा.) वगैरे गोष्टींसंबंधांत कोणाचा मतभेद अल्पमात्र नाहीं. निरनिराळ्या उपनिषदांत

दिसणारा विरोध नाहींसा करून त्यांची एकवाक्यता करण्याचा प्रयत्न ब्रह्मसूत्रांनीं केला असून ब्रम्हसूत्रें नि उपनिषदें यांतील तत्त्व-ज्ञानाची पूर्तता भगवद्गीतेनें केली आहे, या विषयींही कोठें दुमत नाहीं. तथापि बृहदारण्य व छांदोग्य हीं उपनिषदें जर संन्यासाचा पुरस्कार करतात आणि ईश नि कठ हीं जर कर्मयोगाचा पुरस्कार करतात तर निरनिराळया तत्वांची ही वाकळच कां मेहेरबानांनीं म्हट-ल्याप्रमाणें " एकटया हिंदुस्थानचीच नव्हे तर साऱ्या मानवजातीची आहे ! "

कृष्णार्जुनाचा जो संवाद गीतेंत ग्रथित केला आहे तो " ब्रम्ह-विद्यायां योगशास्त्रे " असा आहे. ब्रम्हविद्या ही समष्टिविषयक आहे नि संयोगीकरणपद्धतीनें कर्माची मीमांसा करते. योगशास्त्र हें व्यक्ति विषयक आहे व तें पृथक्करणपद्धतीनें कर्माचें विवेचन करतें. गीता म्हणजे गाइलेली व उपनिषद् म्हणजे ज्ञान, बोध; अर्थात् भगवंतांनीं गाइलेला बोध तेंच भगवद्गीतोपानिषद्. म्हणून समष्टीला धरून व्यक्तीच्या कर्तव्यासंबंधानें भगवन्तांनीं बोध आळविला आहे हें प्रत्येक अध्यायाच्या समाप्तिमंत्रावरून स्पष्ट होतें. उघडच, समा-जाच्या धारण–पोषण–संवर्धनाकडे लक्ष ठेवून व्यक्तीच्या कर्त-व्याची मीमांसा करण्याचें काम गीतेनें केल्यामुळें आर्यांच्या समाज-शास्त्रावरील तो प्रमाणग्रंथ होऊन बसला तर अस्वाभाविक कांहीं नाहीं.

आतां समाप्तिमंत्र वा धृपद म्हणजे मूळ गीतेचा भाग नव्हे किंवा बोधामृत हा गीतांचा गाभा होऊं शकत नाहीं, हा आक्षेप बरोबर

नाहीं असें नाहीं. कारण काव्याच्या आधुनिक व्याख्येप्रमाणें गीतेला काव्य ह्मणण्याचें धाडस कोण करील ? पण अन्ध धृतराष्ट्रासमोर दिव्य दृष्टीचा संजय रणांगणींचें चित्र उभें करीत असतां कृष्णार्जुनांचा संवाद सांगतो आणि त्या संवादांत गीतेचा कर्ता व्यास आपल्या हृदयीं मुरलेलें जीवित–तत्व मोठ्या आत्मविश्वासानें उमटवितो हें सर्व एखाद्या काव्य– विषयाच्या रूपरेखेस साजण्यासारखें नाहीं काय ? शिवाय, व्यावहारिक कल्पनेला कितीही ताण दिला तरी गीतेंत आज उपलब्ध आहे तसा कृष्णार्जुनसंवाद रणांगणींच्या धुमश्चक्रींत होणें संभवनीय वाटत नाहीं; आणि ह्मणून रणांगणीं जें कार्य केवळ ध्वनीनें किंवा खुणांनीं झालें असेल, त्याचा संजयासारख्या निवेदकाच्या तोंडून आविष्कार करण्यांत गीतेनें कविसांप्रदायच अनुसरला नाहीं काय ? आणखी असें कीं, काव्यगीताचा गाभा जी भावना ती क्षणमात्र गीता विसरली नाहीं. भक्ति हा हृदयाचा विषय आहे, एवढयावरच हें विधान केलें नसून गीतेनें मानवी हृदयास हात घालण्याचे प्रसंग हरहमेष साधले आहेत. दोन्ही पक्षांची रणांगणावरील तयारी, अर्जुनाचा विषाद, " क्लैब्यं मा स्म गमः पार्थ " सारखें हृदयाचें पाणी पाणी करणारें वाक्ताडन, " पांडवानां धनंजयः " म्हणून विभूतियोगांत केलेली चुचकारणी, विश्वरूपदर्शनाचा रोमहर्षण–अद्‌भुतरस–प्रसंग, त्या दर्शनानें भुलून गेलेल्या कातर अर्जुनास मोहिनी– विद्याविशारदाप्रमाणें ' निमित्तमात्रं भव सव्यसाचिन् ' असें उपदेशून आपला शस्त्रधारी बनविण्याची क्लृप्ति वगैरे वगैरे प्रसंगांची

वरवर आठवण केली तरी असले प्रसंग कोणता कवि कानामागें टाकील, असा प्रश्न मनामध्यें उभा राहिल्याशिवाय राहतो काय ? आणि इतक्या खोलांत तरी कशाला जावयास हवें ? मानवी जीवन आणि स्वभावरेखन यांचें ज्ञान, सौंदर्योपासना व सौंदर्योपभोग यांची वाढती जाणीव, त्याप्रमाणें स्वतःचें जीवन उत्साहमय नन्दनवन करण्याची स्फूर्ति अशा तीन गोष्टींची अभिजात काव्यापासून अपेक्षा करतात ना ? मग गीतेपासून हे तीनही फायदे होतात असें गीतेच्या जागतिक भृंगांनीं केलेल्या गुंजारवावरून स्पष्ट होत नाहीं काय ? आणखीही असें सांगतां येतें कीं गीतेनें योजलेल्या उपमा, दृष्टांत—विरोधाभास इतके समर्पक आहेत कीं त्या समर्पकतेपायीं कवींनीं खरोखरच थक्क व्हावें. शिवाय, ' रसात्मकं काव्यं ' या दृष्टीनें विचार करतां, गीतेंत शांतरस कसा ओथंबून राहिला आहे ! आणि त्याला मध्येंच वीररसाची छटा व अकराव्या अध्यायीं रौद्र नि अद्भुत रसाची जोड मिळाल्याकारणानें तेवढयापुरता रसविप्रलंभही साधला आहे. तात्पर्य, समाजधारणेसाठीं व्यक्ति—कर्तव्याचें बिनचूक शास्त्र सांगताना नुसत्या तत्वज्ञानाचा बुद्धिवाद सांगत बसण्यांत गीतेनें धन्यता मानली नसून मनुष्याला अन्तःकरण असतें याची पुरेपूर जाणीव राखली आहे आणि भावनांच्या नाजूक संवेदना छेडून बुद्धीचे जलतरंग खुलविले आहेत.

अशा तऱ्हेनें काव्य-प्रांताशीं गीता आपली फारकत करून घेत नसल्याकारणानें, अभिनवगुप्ताचार्य अगर म. गांधी थोडें पुढें

जाऊन ह्मणत असतात कीं गीता हें मुळीं सर्वस्वीं रूपकच आहे. अर्जुनाला कृष्णानें गीता सांगितली ती, ऐन रणांगणावर दोनही बाजूंची सैन्यें परस्परांवर टणत्कार करण्यासाठीं सज्ज असतांना सांगितली हें एरव्हीं शक्य कसें ? भारतीय युद्ध हें धर्मयुद्ध होतें खरें; पण, " थांब, माझ्या अर्जुनाला ताळ्यावर आणतों " असें कृष्णांनीं कौरवेश्वराला सांगून घटकाभर गंमत खेळण्याचा तो विटी—दांडूचा खेळ खास नव्हता. पृथ्वी आणि आकाश गरजून सोडणाऱ्या पणवानक—गोमुखादि शंखांसुद्धा रणवाद्यांच्या गर्जना होऊन धनुष्यावर बाण चढविण्याविषयीं आपापलें हात सज्ज असल्याची इषारत दोनही सैन्यांनीं केल्यानन्तर, अर्जुनाला करुणेनें ग्रासलें ह्मणून, त्यानें कसून खोदून प्रश्न विचारावे व तोलून पेलून योजलेल्या शब्दांनीं कृष्णांनीं त्याचें समाधान करीत बसावें, असा धीमा प्रसंग तेथें कसा बरें साजरा झाला असेल ? झटून आणि हुंदड्या देऊन कासेला तोंड लावलेल्या वासरानें मिळेल तेवढा दुधाचा थेंब न् थेंब घ्यावा, त्या-प्रमाणें अर्जुनाचे प्रश्न; कौतुकानें वरचेवर " चोरलेला पान्हा " सोडून पचनीं पडेल तशी वासराची भूक शमवीत शमवीत त्याला आनन्दी-आनन्द करून सोडणाऱ्या गाईप्रमाणें श्रीकृष्णानें केलेलें समाधान; त्या रेखीव—कांतीव संवादाला साधें वाचावयाला लागणारा अडीच घटकांचा अवधि या सगळ्या गोष्टींचा शांतपणें विचार केला व वर भरीला कृष्णार्जुनांची योग्यता लक्षांत ठेवली तरीही, गीतेचा संवाद रणांगणींच्या धुमश्चक्रीपेक्षां आचार्यकुलाच्या शांततेस अधिक शोभ-

णारा आहे, हें कोणीही कबूल करील.

मग काय, गीतेचा प्रसंगच अनैतिहासिक आहे काय ? मूळ भारत किंवा त्याचें प्रारंभीचें स्वरूप " जय " तत्त्वज्ञानात्मक महाकाव्य आहे, त्यांत इतिहासाचा कांहीं गंध नाहीं, असें प्रतिपादणारे महात्मे नाहींत, असें नाहीं. परन्तु " महाभारताचा उपसंहार " या ग्रंथांत कै. चिंतामणराव वैद्यांनीं स्पष्ट सिद्ध केलें आहे कीं महाभारतांतील कौरव–पांडव–यादवादि घराणीं या भारत वर्षांत आपल्या पराक्रम–चारित्र्यानें प्रत्यक्ष नांदलीं आहेत. आतां पाश्चात्य नि आधुनिक कल्पनेप्रमाणें इतिहास लिहावयाची प्रथाच त्या काळीं नसल्याकारणानें बादरायण व्यासांनीं इतिहास सांगतांनाच काव्य–तत्त्वज्ञानाचा विस्तार केला असल्यास नवल नाहीं.

ऐतिहासिक पृष्ठभागावर व्यासानें तत्वज्ञानाचा उभार केला असें जर खरें, तर मग अर्जुनाचा विषाद आणि चतुराईनें कृष्णानें त्याच्या वृत्तींचा साधलेला ताळेबन्द, ही खोटी कशीं ह्मणतां येतील ? हा सारा प्रकार ह्मणजे कुरुक्षेत्रींचा कृष्णार्जुन–संवाद सर्वथैव " ध्वनि-काव्य " च होता. तथापि खरोखर घडलेली गोष्ट, कवि ज्यावेळीं पार्श्वभूमीसुद्धां त्या गोष्टीतील व्यहारीबहारींच्या आनन्दासकट देत असतो, त्यावेळीं समर्यादच कां असेना, पण तो पौर्णिमेच्या भरतीचा सागर उभा करीत असतो. त्या दृष्टीनें तत्त्वज्ञान, व्यवहार आणि मन–मेंदू–मनगट ही मनुष्याचीं मुख्य अंगें यांचा व्यष्टि–समष्टि–परमेष्ठि यांच्याशी सुखकर समन्वय व्यासानें असा कमालीचा घातला आहे कीं मी मी म्हणणाऱ्या विचारवन्तानीं कोणत्याही काळीं मान डोलवावी.

# ३ गीता धर्माचें बीज.

यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः ।
तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ॥

असें खडखडित धृतराष्ट्राच्या तोंडावर सांगणाऱ्या संजयाला निमित्त करून कृष्णार्जुनांचा बहुबोध संकेतसंवाद व्यासानें विस्तारून त्यांत आपले उत्तमोत्तम तत्त्वज्ञान गोंवलें. त्यांत चतुराई आहे. श्रीकृष्ण आपल्या स्वतःच्या काळचा अतुलनीय महापुरुष होता असें बंकीमचन्द्रासारख्या भौतिकवाद्याचेंही मत आहे. तेव्हां अशा ऐतिहासिक महापुरुषाला आपला गीतानायक बनवून आपलें तत्त्वज्ञान त्याच्या तोंडून वदविणें हें येरागबाळांचें काम नव्हे. त्या ऐतिहासिक महापुरुषाच्या जीवन—तत्वाशीं बाध न येण्याइतकें ग्रंथकारचें तत्त्वज्ञान व स्व—भाव—परीक्षण बळकट असावें लागते. व्यासाच्या जवळ ही बळकटी होती. कृष्ण " शाश्वत पुरुष " असल्याबद्दलची ग्वाही आपल्याला देणाऱ्यांत अर्जुनानें कृष्णाबरोबरीनें व्यासाचें नांव घेतलें आहे. किंवा कांटेकोर खरें सांगावयाचें ह्मणजे अर्जुनाच्या तोंडी व्यासानें तसें घातलें आहे. ( १०।१३ पहा ) अर्जुनासारख्या नरशार्दूलाच्या तोंडी स्वतासंबन्धीं असें मत घालणें आणि पुढें (१०।३७) ' मूनीनाप्यहं व्यासः ' असें श्रीकृष्णाच्या तोण्डीं घालणें हें आत्मविश्वासपूर्ण जगदभ्यासाचें काम आहे, आणि असा अभ्यासपूर्ण आत्मविश्वास व्यासा-

जवळ होता ह्मणून तर ' व्यासोच्छिष्टं जगत्सर्वम् ' ही लोकोक्ती होऊन राहिली. खुद्द गीतेपूर्वी झालेल्या तत्त्वज्ञान–शाखांचा सुन्दर मेळ घालून गीतापूर्व व गीतोत्तर सर्व पंथीयांना आपापलें प्रतिबिंब व्यासाने गीतेंत पहावयास लावलें, आपल्यापुढें गीतेचा कित्ता ठेवण्याचा मांड जगास मांडावयास लावलें, यापेक्षां ' व्यासोच्छिष्टं जगत् सर्वम् ' चा दुसरा दाखला कशाला हवा ? आणि कृष्णार्जुनाला व्यासानें बरोबर हेरलें होतें हें दाखविण्यासाठीं खटाटोप कशाला ?

जगाला काबूत राखणारें तत्त्वज्ञान ऊर्फ गीताशास्त्र तसेंच योग्यतेचें असावयास हवें. तें तसें आहेही. मार्गशीर्ष शु॥ ११ ला कुरुक्षेत्रावर कौरव–पांडवांच्या सैन्यांनीं सलामीचे शंख वाजवून एकमेकांचीं आव्हानें स्वीकारलीं; अर्जुनानेंही आपला देवदत्त शंख फुंकून गांडीव धनुष्य सावरीत सावरीत कृष्णाला ' सेनयोरुभयोर्मध्ये रथं स्थापय मेऽच्युत ' असें सांगितलें. हेतु असा कीं ' कैर्मयासह योद्धव्यमस्मिन् रणसमुद्यमे ' हें एकदां पडताळून पहावें. त्याप्रमाणें स्वतःच्या रणकौशल्याची करामत करायला पाहिजे आहे याचा अंदाज घेऊं पाहणाऱ्या अर्जुनाचा रथ दोन सैन्यामध्यें नेऊन उभा केला आणि अर्जुनानें एकवार चौफेर नजर फेंकली. फेकली मात्र तों " वेपथुश्च शरीरे मे रोमहर्षश्च जायते । गांडीवं स्रंसते हस्तात्त्वक्चैव परिदह्यते " अशी अवस्था स्वतांची होऊन राहिल्याचें तो स्वतांच भगवन्तास सांगतो. अशी अवस्था होण्याचें कारण ? अर्जुनाचा काय आत्मविश्वास गळला होता ? आपल्या हातून हें युद्ध रेटणार नाहीं. त्या

जमलेल्या अतिरथिमहारथींपुढें आपणांस हार खावी लागेल अशी का भीति अर्जुनास वाटली होती ? लवमात्र नाहीं. " न च श्रेयोऽनुपश्यामि हत्वा स्वजनमाहवे " आणि त्याच्यापुढील अर्जुन–विषादांतील वाक्यें अवलोकन केलीं तर स्पष्ट लक्षांत येईल कीं, सामना करावयास आलेल्यांना चारी मुन्डे चीत करणें अर्जुनाला अगदीं सहज शक्य वाटत होतें; परन्तु ते सर्व सामनेवाले आपले स्वतांचेच काके, मामे, मेहुणे, गुरू व मित्र व सोयरीक असल्याकारणानें त्यांना रणांगणीं लोळवल्यावर मिळविलेला विजय व राज्य कितपत आनन्ददायी होतील, अशी अर्जुनाच्या मनानें पाल खाल्ली. वाटेकरी होण्यास, कौतुक करण्यास, आदरानें बघण्यास किंवा आशिर्वाद देण्यास जिव्हाळाच शिल्लक नसेल तर, एरवीं आनन्द ह्मणून गणली गेलेली संवेदनाही जीवखाऊ ठरते. अर्थात अर्जुनाच्या मनाला विषाद झाला होता तो विराटगृहींचे बृहन्नडत्व कुरुक्षेत्रावर जागे झाले ह्मणून नव्हे, तर कार्यकारण–भावांची साखळी तीव्र बुद्धिमत्तेच्या जोरावर जोडून प्रखर पराक्रमांनीं हाती लागणाऱ्या विजयश्रीची भेसूरता अर्जुनाच्या डोळ्यापुढें चमकू लागली ह्मणून. तात्पर्य, गीतेनें जो उपदेश अर्जुनाला व अर्जुनाच्या द्वारा जगाला दिला आहे त्याच्या ग्रहणाची तयारी अशी धीरोदात्त हवी. ' जातिवन्त पाणी कोठेही चमकतेंच ' ( A Hero is a Hero at all points ) हे कार्लईलचे अर्धसत्य तरी अंगीं मुरल्याबाणल्याशिवाय गीतेची शिकवण गिरवण्यासाठीं पाटी साफ धुतल्याचेहीं श्रेय मिळणार नाहीं. मन, मनगट,

आणिमेंदू यांच्या एकजीव भिडणीचा तल्लखपणा रसरसल्याशिवाय प्रज्ञा काम करीत नाहीं. 'प्रज्ञावादांश्च भाषसे' असा अर्जुनाला भगवन्तांनीं तडाखा ओढला आहे हे लक्षांत ठेवणें जरूर आहे. हा तडाखा मारण्याच्या अगोदर कृष्णानें अर्जुनाला जर कांहीं हडसून खडसून बजावलें असेल, तर

क्लैब्यं मा स्म गमः पार्थ नैतत्त्वय्युपपद्यते ।
क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वोत्तिष्ठ परंतप ॥

या फटकाऱ्यांतच गीता–धर्माच्या उभारणीचे बीज आहे. तें पुरुषा-र्थाचे-पराक्रमाचे आहे. परंतप ह्मणजे शत्रूला त्रास देणारा ह्मणून ज्याची कीर्ति, प्रस्तुत सामन्यांत शत्रूला रणांगणीं लोळवण्याबद्दल ज्याला आत्मविश्वास, पण श्रेय काय याच्या विचारानें ज्याच्या हृद-याला चंचल केलें, त्या अर्जुनाला नामर्द–नपुंसक होऊं नको असें कृष्णानें बजावले आहे. पंडितागिरीच्या बाता सांगण्याइतकी प्रगल्भ बुद्धिमत्ता, पुढें ठाकलेल्या परिस्थितीवर मात करण्याचा विश्वास असण्याइतपत करामत आणि व्यक्तीच्या नव्हे तर समाजाच्या हिताच्या दृष्टीनेंच स्वतां गाजविणार असलेला पराक्रम किती श्रेयस्कर यांच विचारानें स्पन्दन पावणारें हृदय–एवढे औदार्य, एवढी उदात्तता, पुरुषार्थावर– पराक्रमावर– तेजस्वीपणावर– पाणीदारपणावर आसन स्थिर करणाऱ्या गीताधर्माला किमान पक्षीं लागत असते.

तेजस्वी जीवासाठी गीता आहे. Live and live better याच्या पलिकडे पुरुषार्थाची ज्यांना कल्पना नाहीं त्यांना, " गीता

तेजस्वी जीवांना शिकवण तरी देणार कशाची ?" अशी भ्रांति होणें अगदीं साहजिक आहे. स्वार्थ एके स्वार्थ, परार्थाविरोध स्वार्थ, परार्थ–सापेक्ष स्वार्थ, परार्थान्तर्भूत स्वार्थ, समाजाधिष्ठित स्वार्थ, समष्टिहित स्वार्थ, बहुसंख्याहितरत स्वार्थ येथपर्यंत फार तर मजल मारलेल्या आधिभौतिक चिकित्सकांस, रणधुमाळीच्या घाईघाईंत श्रीकृष्णानीं अर्जुनाच्या गळीं उतरलेल्या गीता–धर्माचा परिचय होण्यापूर्वी तिरस्कारयुक्त भ्रम वाटेल; परन्तु परिचयानन्तर गीताधर्माचे ते वेडेपिसे बनतील. परार्थाची तेजोवलयें केंद्रीभूत स्वार्थाच्या भोंवतीं कितीही उभारलेली असली तरी स्वार्थातील ' स्व ' चा संकुचितपणा कायमच असल्याकारणानें, भौतिक तत्वज्ञानाच्या श्रुतिमनोहर वा दृष्टी–मनोहर देखाव्यांत सच्चिदानन्दाचा लेशमात्र नाहीं. उघडच आहे. पायापुरती वहाण कापून राहिलेल्या चोळयामोळयांतून जास्तींत जास्त लोकांच्या कांटे–बोंचणीचें निवारण साधेल तेवढें करावयाचें, या ध्येयांत वासनांची वृद्धी भूमिति–श्रेढीनें होत असते. वासनांची वृद्धी सुलभ सुखांच्या व सोयीच्या समृद्धिसाठीं ह्मणजे मानवी उत्साह–काळ–धन इत्यादिकांच्या स्वल्पतम परिमाणांत हरतऱ्हांचीं सुखें आणि सुखांच्या हरतऱ्हा प्राप्त व्हाव्या ह्मणून, वाढती वासनांची परंपरा उद्योगरातिला जन्म देत असते. ' असंतोषः श्रियो मूलं ' या सूत्रावर जीवित आधारून आणि ' अशक्य ' शद्बाला मूर्खांच्या शद्बकोशाची अन्धारकोठडी दाखवून तीव्र बुद्धिमत्तेच्या नवोनव पैलूच्या चमकेंत, अमर्याद वासनावृद्धीनें असे अकल्पित व कल्पनातीत उद्योगमार्ग अव-

लंबण्यांत येतात कीं कामाखालीं मरतांना या उद्योगरतांना कीर्ति-रूपानें उरण्याइतकी तरी सवड आहे कीं नाहीं, याची जबरदस्त शंका येते. निसर्गाच्या प्रत्येक शक्तीची राबवण मानवी सुखसंवर्धनापायीं करण्याची अहमहमिका करणाऱ्या तेजस्वी जीवांना सकृद्दर्शनीं ' भगवद्गीता आह्मांला काय सांगणार ? ' असा कुरा, क्षणभर कां होईना, येणें अगदीं साहाजिक आहे. पण या विश्वामित्रांना निसर्ग आणि परिस्थिती यांच्या जुळवाजुळवीला नेहमींच आटोक्यांत ठेवतां येत नाहीं. पुष्कळ वेळां या विश्वामित्रावर ती उलटतांना आढळतात. मोटारकिंग हेन्री फोर्ड अगर चाकोलेट–किंग टॉन्ड्री यांच्यासारखी उदारशील भांडवलशाही समाजसत्तावादाला जितकी आडवी येते, तिच्या किती तरी पट मनुष्याच्या प्रगल्भ कर्तबगारीच्या आटोक्याबाहेर असलेल्या सुप्त शक्ति त्याच्या आक्रम–शक्तीवर आदळतात आणि कित्येकदां त्याला अगदीं नामोहरम करतांना आढळतात. " अधिष्ठानं तथा कर्ता करणं च पृथग्विधम् विविधाश्च पृथक्चेष्टाः " यांच्यापुढें ' दैवमेव ' असें जें ' कर्मणां सिद्धये ' आवश्यक सांगितलें आहे, त्यांतील बीज एक परी मानवी पराक्रमाच्या अंतीम मर्यादा दिग्दर्शित करण्याचेंच आहे. आणि ह्मणूनच लोकमान्यांनीं म्हटल्याप्रमाणें " सर्व भूतांच्या हितामध्यें रत होऊन स्वार्थाचा सर्वस्वी परार्थांत लय करणें व अशा आत्मौपम्य बुद्धिनें जगांतील कामें करणेची " शिकवण गीतेनें आधिभौतिक तेजस्वी जीवांना देऊन ठेवली आहे.

# ४ गीतेचा भक्तियोग.

संकुचित ' स्व ' चा जगन्मय विकास करून, स्वतःला नांव-निशीवार विसरून व जगत्कार्य आचरून राहणें ( ११।५५ ) हें अनन्य भक्तीचें लक्षण आहे. गीतेचा हा भक्तियोग खरोखरीच विलक्षण होय. स्थितप्रज्ञ, त्रिगुणातीत अगर ब्रह्मभूत ह्मणून गीतेनें निरनिराळ्या तीन ठिकाणीं निरनिराळ्या शब्दांनीं भक्ताचेंच वर्णन केलें आहे. अर्थात् अत्यंत योगयुक्त चित्तानें श्रीकृष्णांनीं जें व्यष्टि–समष्टि –परमेष्टींचा ( व्यक्ति–समाज–विश्वशक्ती ) समन्वय घालणारें नीतिशास्त्र अर्जुनास सांगितलें तें एकमार्गी नाहीं; सर्व मार्गांचा समन्वय घालणारें आहे.

मनुष्य हा सहवासप्रिय, बुद्धिवान्, आणि सहकारी प्राणी आहे आणि ह्मणूनच ए. एस्. एम्. हचिन्सन् ह्मणतो कीं, ( Life is sacrifice ) जीवन यज्ञ आहे. गीतेनें तर " सर्वं यज्ञे प्रतिष्ठितम् " हा व्यापक सिद्धांत सांगितला आहे. यज्ञ ह्मटला कीं, संकुचित स्वार्थाचे एक परी मरण व एक परी शुद्धीकरणात्मक विकास. अर्थात् व्यक्ती करीत असलेला यज्ञ समष्टीच्या सेवेच्या दृष्टीनें जितक्या वरच्या दर्जाचा, तितक्या परीनें मनुष्य पशुपणापासून परमेश्वरत्वाप्रत पोहोंचत असतो. जो मूर्तिमन्त सामर्थ्याइतका समर्थ आणि यद्यपि स्त्रीचें हृदय बाळगणारा तोच खरा मनुष्य होय असें विवेकानन्द सांगतात. स्त्रीहृदयाच्या निष्ठेनें समष्टीची सेवा सामर्थ्यवान् कर्तब-

गारीचा परीघ वाढवून करीत गेलें ह्मणजेच तेजस्वी मनुष्य मानसशास्त्रदृष्टया मोठयांत मोठा—संपूर्ण, समष्टीस्वरूप होऊन राहतो. कारण मन ह्मणून ज्याला ह्मणतात तें दुसरे तिसरे कांहीं नसून ज्याला वेदांत " महत् " ह्मणून संबोधतों अथवा पाश्चात्य भाषासरणी ज्याला " जगत्कारण " असें नांव देते त्याचा एक मेंदूच्या पिंजऱ्यांत पकडलेला अंश होय; आणि ' महत् ' च्या वा जगत्कारणाच्या जाळयांत अकलेची, मेंदूची जी संकलित सृष्टि होते ती समष्टि होय. अर्थात् मानवी मनाची उन्नति समष्टींत झाल्यावर त्याची परिणती परमेष्टींत ह्मणजे समष्टीवरील तेजोवलयांत होते आणि त्या परिणतीमुळें केवळ बुद्धिग्राह्य व अतींद्रिय असा जो आनन्द होत असतो तोच ब्रह्मानन्द होय. [ पहा कीं ब्रह्मन्=उभारलेले, वाढलेले, मोठे झालेले हा अर्थ बृह्= उभारणें, वाढणें, मोठे होणें या धातूमुळें येतो. ]

हा ब्रह्मानन्दाचा सोहळा, मोक्ष ऊर्फ मुक्ती म्हणजे परमतत्वाचें ज्ञान होऊन बुद्धि सर्वाभूती शान्त व सम होते. " अज्ञान—हृदय—ग्रंथिनाशो मोक्ष इति स्मृतः " असें शिवगीतेनेंही सांगितलें आहे. ही मनोवस्था आध्यात्मिक आहे. जगत्कारणाचा जो अंश स्वतांत आहे तो समष्टीच्याही पलिकडील जगत्कारणाचे व्यापक स्वरूपाशीं समरूप आहे हें अनुभवून त्या उच्चतम भूमिकेवर जगाचे व्यवहार करणें वेदोक्तीप्रमाणें खरोखरच सामर्थ्यवान्, निकोप, तीव्र बुद्धीच्या तरुणांचेंच काम आहे. कारण त्याचें साधन वैराग्य मात्र आहे. आणि वैराग्य म्हणजेच विवेकानन्दाच्या मताप्रमाणें निर्भयता कीं जी तरु-

णांचेंच वैशिष्टय होऊं शकते. ( सर्वम्भोस्ति भयान्वितं भुवि कृणं वैराग्यमेवाभयम् )

वैराग्य ह्मणजे वास्तविक इंद्रियपरावृत्ति असा अर्थ असता "ना भयेत्" हा अर्थ–हा उपनिषदाचा संदेश त्यांतून कसा निर्माण होतो ? वैराग्य याचा अर्थ विवेकानन्दानीं "क्रमवार मरण" असा दिला आहे. "इंद्रियार्थेषु वैराग्यम्" असा धागा गीतेनें लावून "कोणत्याही विषयांतील–कर्मातील इंद्रियांची लोलुपता काढून टाकणें, मारणें आणि अशा तऱ्हेनें निःसंग, निष्काम अलिप्त, अनासक्त होणें ह्मणजेच वैराग्य बाणणें होय." असा समन्वय घालून दिला आहे. येथें कर्म टाकावयाचें नाहीं, कर्म व त्याची परिणती समजणारी वा त्या त्या परिणतीस आचरणारीं इंद्रियें मारावयाचीं नाहींत; तर इन्द्रियांची लोलुपताच हें जीवनसर्वस्व अशी जी समज ती मारून समष्टीच्या क्षेत्रावर कर्तृत्वाच्या त्रिज्येनें वर्तुळ रेखाटावयाचें. दुसऱ्या शद्बांनीं सांगावयाचें तर मनानें इंद्रियांवर करडी नजर ठेवून अनासक्त बुद्धीनें समाजहितार्थ उत्कटतेनें काम करावयाचें. देवसमाजाच्या शांत, दांत धारणेसाठीं स्वतांच्या हाडांचें धनुष्य होणें जरूर आहे असें कळल्याबरोबर तेथल्या तेथें व तत्क्षणीं स्वताचें शरीर जाळून देवसमाजासाठीं आपलीं हाडें ठेवणारा दधीचिसारखा 'ज्ञानविज्ञानतृप्तात्मा' ह्मणजेच समाजाशीं एकपरी आपलें जीवन एकरस करणारा तर दुसरे पक्षीं समाजापुढें आपलें व्यक्ति–जीवन पार मारणारा खरा "यज्ञशिष्टासन् सन्त," खरा "स्थितधर्मुनि" होय.

वैराग्यपूर्ण यज्ञाधिष्ठित कर्माचरणात संकुचित व्यक्तित्वाचे सोळा आणे मरण आहे; तर प्रथम समष्टीशीं व नन्तर परमेष्टीशीं एकरूपता येत असल्याकारणानें, ' स्व ' चा उच्चतम–महत्तम विकास होतो. समष्टीची सेवा, आसक्तीचा त्याग, उघडया डोळ्यांचें निधडें कर्माचरण असा गीता–प्रतिपादित भक्तियोग आहे आणि ह्मणूनच या भक्तियोगांतर्गत मुनीश्वराचें वर्णन एकदां गुणातीताच्या, तर एकदां सांख्ययोगाच्या, एकदां कर्मयोगाच्या तर एकदां ब्रह्मनिष्ठांच्या परिभाषेंत मांडून गीतेनें आपला ध्येय-पुरुष सगळया परिभाषांच्या समन्वयानें अभ्यासकाच्या मनावर ठसवला आहे.

## ५ गीतेचा ध्येयपुरुष

गीतेचा ध्येयपुरुष समष्टीशीं समरूप होत असल्याकारणानें तो ' सर्वसंगपरित्यागी ' असतो. ह्मणजे करून अ–कर्ता असतो. त्याचे सर्व समारम्भ कामसंकल्पवर्जित असतात. तसेंच त्याला कर्माच्या ठिकाणीं अकर्म आणि अकर्माच्या ठिकाणीं कर्म दिसत असते.

हे काय शद्वांचें गौडबंगाल आहे ? कल्पनेची कसरत आहे ? कीं वागलंकाराची गंमत आहे ? आहे, हें सर्व कांहीं आहे; पण वर वस्तुस्थितीचें वर्णनही आहे.

कसें तें पहा:—

" नियतं कुरु कर्म त्वं " अशी गीतेची शीक आहे. आणि

गीतेचा असाहि उपदेश आहे कीं " सहजं कर्म कौंतेय सदोषमपि न त्यजेत् ! " सहज कर्म ह्मणजे आपल्याबरोबरच जन्मलेले कर्म टाकावयाचें नाहीं, मग तें किती का दोषांनीं माखलेलें असेना ! अर्थात् ते तेवढयापुरते ' नियत ' म्हणजे नेमलेलेंच कर्म होय. पण जसें सहज कर्म नियत आहे, तसेंच नियत कर्मही सहज होतें. मनुष्य ' स्व ' चा सम्पूर्ण संकोच करण्यास आणि समष्टीशीं समरस होण्यास ज्यावेळीं, जेवढा वा जसजसा निघेल, त्यावेळीं, तेवढें आणि तसतसें त्याचें नियत कर्म हेच सहज कर्म होऊं शकतें. श्वास घेणें, चलन-वलन करणें, शरीर संवर्धन करणें, आईबापाशीं पुत्रधर्मानें वागणे, भावाबहिणींना भावासारखे वागविणें ही सहजकर्माची उदाहरणें होत. शाळा धरल्यावर शाळेचा अभ्यास करणें, गुरुजनाशीं शिष्य म्हणून वागणें, मैत्री जोडल्यावर " सुखदु:खपणीं एकरूप " होणें, संस्थेचा घटक झाल्यावर त्याचे कर्तव्य पार पाडणें, लग्न केल्यावर आपली भूमिका आदर्शपणें आचरणें किंवा एकादे तत्त्व वा निशाण स्वीकारल्यावर त्यास अनुरूप असें वर्तन ठेवणें ही नियत कर्में म्हणता येतील. हीं किंवा असली नियत कर्में आपआपल्या क्षेत्रापुरती सहज म्हणजे क्रमप्राप्तच असतात.

मूलत: सहज व नियत कर्माचा श्रेयाच्या दृष्टीनें म्हणजे समष्टीच्या सेवेच्या दृष्टीनें विरोध येतो, अगर दोहोंपैकीं अधिक श्रेयस्कर कोणतें तें ठरविण्याची पाळी येते, तेव्हां अधिक श्रेयस्कर असेल तेंच आणि तेवढेंच नियत व सहज कर्म ठरत असतें. मूलत:

सहज कर्माच्या अगर मूलतः नियत कर्माच्या दोन शाखांमध्यें प्रसंगानुसार वांधा अल्यासही वरील न्यायच लागू पडतो. युद्ध करणें हें क्षत्रियत्वामुळें अर्जुनाचें सहज कर्म होतें आणि आपले सगेसोयरे सन्मानणें हेंही त्याचें सहज कर्मच होतें. पण युद्धाशिवाय बाकीचें सर्व प्रयत्न करूनही युद्ध अपरिहार्य झाल्यामुळें अर्जुनाला तें युद्ध करणें नियत कर्मही होऊन बसलें होतें. अर्जुनाला हें कळत होतें पण ज्यांना सन्मानावयाचें त्यांना मारण्यांत श्रेय आहे कीं नाहीं अशी त्याची ‘ करुणा ’ ऊर्फ क्षुद्र हृदयदौर्बल्य होतें. समष्टीच्या सेवेच्या सत्य दृष्टीनें युद्ध करण्यांत सगेसोयरे मारले गेले तरी अर्जुनाच्या करुणेबरोबरच त्यांचाही संहार होईल त्याला इलाज नाहीं; समष्टीच्या सेवेच्या दृष्टीनें युद्ध एकदां सहज म्हणजे क्रमप्राप्त ठरल्यानन्तर त्यांत स्वजनसंहाराचा दोष असला तरी तें टाकतां येत नाहीं. तात्पर्य, समष्टीच्या सेवेसाठीं ‘ इंद्रियार्थेषु वैराग्यम् ’ साधून संकुचित स्वार्थाच्या यज्ञावर कस लावून जें सहज कर्म ठरतें, तें तें तल्लीनतेनें केलें असतां मनुष्याला सिद्धी मिळते ( १८-४५ पहा ). इतकेंच नव्हे तर तें कर्म हाच त्याचा धर्म असतो आणि स्वधर्मांत वा आधुनिक भाषेंत बोलावयाचें तर कर्तव्यकर्मांत—मरण श्रेयस्कर होतें म्हणजेच सर्वस्वाचा होम देखील समष्टीच्या सेवेसाठीं आणि आत्म्याच्या उन्नतीसाठीं जरूर पडतो. हें सर्व जाणूनबुजून करण्याची संवय झाली म्हणजे तें अंगवळण स्वभाव बनतें आणि

स्वभावानें केलेलें कर्म अकर्मच बनतें. प्रतिष्ठेला खोट न लावताही कर्म हें अकर्म कसें बनतें याचें पटणारें उदाहरण ह्मणून भोजनविधींतील चर्वणाचें देतां येईल. मनुष्य ' जेवलों ' ह्मणून सांगतांना प्रत्येक घासाचें चर्वण करीत असूनही तो विधी केला असल्याचा चुकूनही उल्लेख करणार नाहीं. इतकी निःसंग वृत्ति प्रत्येक कर्मासंबंधीं उत्पन्न झाली पाहिजे व होतेही. अशी वृत्ति बाणली म्हणजेच मनुष्य सर्वारंभ परित्यागी झाला, म्हणजेच मनुष्याचे सर्व समारंभ काम-संकल्पवर्जित झाले. कारण श्रेयस्कर कर्म समष्टीची सेवा करण्यासाठीं चिकित्सेनें ठरवून निःसंगपणें तें पार पाडण्याची वृत्ति बाणली, मुरली, भिनली, कीं मन, मेंदू, शरीर इतक्या एकसमयावच्छेदेंकरून काम करतात कीं कार्य-कारणभावांची तर्कशुद्ध साखळी जाणीवेच्याही बाहेर राहते. अशी गोष्ट सांगतात कीं, पेन्शनींत निघालेला कोणी सैनिक आपल्या नवीन मालकाच्या घरीं 'ट्रे' मधून चहाचे पेले नेत असतां कोणी 'अटेन्शन' हा शब्द उच्चारला. तोंच त्या सैनिकाचे पाय थबकले, 'ट्रे' फेकून देऊन हात मांडीबरोबर सैनिकाच्या थाटांत बिलगले. समष्टीच्या सेवेच्या दृष्टीनें कोणत्याही कर्माबाबत इतकें देहभान, इतकें स्वत्व विसरण्याचें गीतेच्या ध्येयपुरुषाला हातचा मळ होऊन बसलेलें असतें.

असा ऋषीश्वर, असा ज्ञानवान् होणें, अशी सर्वोत्कृष्टता प्राप्त होणें, अशा प्रकारचा पुरुषोत्तम होणें, ही ' परागति ' मिळणें

' पापयोनि ' ऊर्फ, टिळकांच्या भाषेंत बोलावयाचें झालें तर 'सरकार-दरबारांत' ज्यांना ' गुन्हेगार जाति ' असें ह्मणतात तशा प्रकारचा अर्थ विवक्षित असून त्या जातींतील लोकांनाही शक्य आहे(अ.९-३२). नुसत्या अंत्यजाचीच कथा काय, भगवान् वात्स्यायन छातीला हात लावून सांगतात कीं, ऋषी, आर्य, अनार्य फार काय म्लेंछ यांचाही वारसा ' परागती ' वर, मुनीत्वावर आहे.

## ६ गीता धर्मच श्रेष्ठ कसा ?

लोकमान्य टिळकांनीं ह्मटल्याप्रमाणें " गीता हें मोक्षदृष्टया संसार कसा करावा याचें शास्त्र आहे. " आणि संसार तर प्रत्येकाच्याच मागें लागलेला आहे. म्हणून अनार्याप्रमाणेंच म्लेंच्छ जे मुसलमान, खिरस्ती आदिकरून लोक त्यांनाही गीताशास्त्रच उपयोगी आहे काय ? होय. असें आहे कीं, " खिरस्ती धर्म हा ' आत्म्याचा मोक्ष ' या तत्त्वावरच उभारला आहे. खिरस्तीधर्माची मोक्षाची कल्पना ' सलोकता ' आहे. परमेश्वरांतच आत्मा मिळून जावा, इतकी उच्च कल्पना त्याच्यांत नाहीं. " आणि ह्मणूनच कर्नल ऑल्कॉटनें म्हटल्याप्रमाणें सूक्ष्मबुद्धिग्राही लोकांचें जेव्हां खिरस्तीधर्मसारप्रणालींनीं समाधान होईना, तेव्हां त्यांनीं पौर्वात्य तत्वज्ञानाकडे धाव घेतली. सन १८७३ सालीं " सोसायटी ऑफ् सायकिकल रीसर्च " स्थापन

होऊन तिच्या तर्फे १९०३ सालीं मेयरसाहेबांनीं ग्रंथ प्रसिद्ध केला व त्यांत " आत्मा हें जडसृष्टीपेक्षां अत्यन्त भिन्न असें आदितत्व आहे, तें अविनाशी आहे, तें सर्वव्यापी आहे, तें जडपदार्थांच्या मिश्रणाचें किंवा एकीकरणाचें फळ नसून तें स्वतंत्र आहे. " असें प्रतिपादन केलें. मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें–खण्ड ६ पृष्ठें १७ ते २० मध्यें विश्वनाथ काशीनाथ राजवाडे म्हणतात त्याप्रमाणें युरोपियन हे खरोखरच रानटी–अनार्य–दस्यु आहेत असें मानलें तरी विचारान्तीं त्यांनाही सर्वव्यापी आत्म्याचें वा ब्रह्माचें तत्त्व आकलन होऊ शकतें हेंच वरील प्रमाणावरून सिद्ध होतें. किंबहुना, सेल्टीक प्यूटॉनिक, ग्रीक व लातीन पुराणदन्तकथावरून प्रो. व्हीसनें प्राचीन आर्यांचें मूळ उत्तर ध्रुवापर्यंत नेलें आहे तें आणि वेद व अवेस्ता यांच्या आधारें टिळकांनीं आर्यांचें मूळ उत्तर ध्रुव ठरविलें तें, हीं दोनही लक्षांत घेतलीं तर पौर्वात्य तत्वज्ञानाचीं तत्त्वें ग्रहण करण्याची ताकद युरोपियन बुद्धींत मुळचीच आहे; कारण उत्तर ध्रुवाजवळ सर्व आर्य एकत्र असतां ' वेद ' हाच त्यांचा धर्म होता. " वेद ' नित्य, ' ' अनादि ' व ' अपौरुषेय ' याचा अर्थ आहे असा कीं, त्याचें मूळ हिमांतर काळांत गडप झालेलें आहे; त्याच्या सूक्तांचा मतितार्थ हिमांतरकालीन असून हिमोत्तरकालीन ऋषींनीं तो फक्त नव्या शब्दांत ग्रथित केला आहे. " ( टिळक ) आणि तो इतक्या समष्टीच्या सेवेच्या दृष्टीनें कीं वेदांच्या ' काळाला पुरून उरणाऱ्या ' प्रभावशाली ऋचांवर त्या त्या ऋषींनीं नांवापुरती देखील स्वदस्तुरी

केली नाहीं. ऋषीबुद्धीचा हा सुप्त वारसा पौर्वात्याप्रमाणेंच पाश्चिमात्यांच्याही मेंदूंत असल्याकारणानें ' सर्वभूतहिते रत ' होण्याची शिकवण अगर ' अनाश्रितः कर्मफलं कार्यं कर्म करोति यः स संन्यासी च योगी च ' हा सिद्धांत पाश्चात्य मेंदूस पटावयास कांहींच अडचण नाहीं.

पण हें सारें पुराण केव्हां ? पाश्चात्य व पौरात्य हे दोघेही उत्तर ध्रुवाजवळील एकच आर्य ठरतील तेव्हां तसें करणें घायकुत्या बुद्धीचा अचपल दूरान्वय होईल. या दूरान्वयाच्या पुसट अस्तित्वाविरुद्ध उपलब्ध इतिहास तरी खास आहे. " परमेश्वरानें सात दिवसांत सृष्टी निर्माण केली व प्राण्यांची उत्पत्ति करतांना पशु, पक्षी, कीटक, मनुष्य वगैरे निरनिराळ्या जाति आपल्या शक्तीनें पृथक् निर्माण केल्या, इत्यादि बायबलांत गोंविलेल्या कल्पना बायबल रचलें जाण्यापूर्वींच वेडगळ ह्मणून आमच्या तत्ववेत्यांनीं झुगारून दिल्या होत्या. जीवकोटींतील पशुपक्ष्यादि निरनिराळ्या जातींतील उपजाति एका सामान्य जातींतून उत्क्रांति तत्वानें निघाल्या आहेत, असें जें मत डार्विनसाहेबांनीं प्रस्थापित केलें व जें उत्क्रांतितत्व स्पेन्सरसाहेबांनीं व्यवस्थित रीतीनें सर्व सजीव निर्जीव सृष्टीस लावून दाखविलें तें तत्त्व आमच्याकडे सांख्यांनीं फार प्राचीन काळीं शोधून काढलेलें होतें. " ( टिळक ) इतिहास अशा स्वरूपाचा असल्या कारणानें मेयरसाहेबांनीं आत्म्याचें सर्वव्यापकत्व सिद्ध केलें; नीत्सेसारख्यांना ' चातुर्वर्ण्या ' सारखी समाजव्यवस्था पाश्चिमात्यांनीं स्वीकारली

पाहिजे असें वाटत असलें; वेद-झेंडावेस्ता-वेंदिदाद यांच्याप्रमाणेंच अमेरिकन गद्य-कवि रीचर्ड लगालियन आपल्या ' पेंटेड शॅडोज ' मध्यें " मनुष्याच्या व्यवहारांत पावलोपावलीं प्रत्येक बारीकसारीक कर्मांतील सद्भावापुरती, एक एक देवता त्याच्या पाठीशीं उभी राहून त्याला मदत करते " असें प्रतिपादन करीत असला, तरी डॉ. बॅरोज म्हणतो त्याप्रमाणें तेवढया सुधारणा करून ख्रिस्ती धर्म हा जगधर्म होईल अशी कल्पनाही करवत नाहीं. कारण ख्रिस्तीधर्म विश्वबंधुत्त्वापुढें उंच जाऊं शकत नाहीं; तर सर्व विश्वाचें शाश्वत ऐक्य ऊर्फ अद्वैत गीताधर्म शिकवतो. पण याही उप्पर " एकं सद्विप्रा बहुधा वदन्ति" आणि त्यायोगेंच उत्पन्न होणारी ' धार्मिक सहिष्णुता ' व त्याचबरोबर आधुनिक शास्त्रीय शोधांशीं तसेंच निसर्गाविष्कारांशीं संपूर्ण एकतानता हे गीताधर्माचे गुण ख्रिस्ती धर्मांत आहेत कोठें? रे. डॉ. ॲबेरसारखे अभ्यासू महाराष्ट्र संतकवींचे ब्रेडे बनतात ते वैदिक धर्माचें तत्वज्ञान ह्मणजे अध्यात्म, परमार्थ, नीतिशास्त्र ( गीतारहस्य प्र. १२ पहा ) व मानसशास्त्र यांचा समन्वय घालणारें तत्वज्ञान होय; ह्मणूनच ख्रिस्ती धर्माचे प्रॉटेस्टंट, कॅथॉलिक ग्रीकचर्चवाले, कॅल्टानिष्ट, फरीचर्चवाले, हायचर्चवाले वगैरे वगैरे निरनिराळे पंथोपपंथ घेतले तरी ॲडमच्या, अवस्थाइतकीच त्यांच्या साल्व्हेशनची ऊर्फ मुक्तीची कल्पना आहे. परमतत्त्वाचे अनुभवात्मक ज्ञान होऊन बुद्धि आत्मनिष्ठ—ब्रह्मनिष्ठ—सर्वांभूतीं सम व शांत होण्याची कल्पना त्या धर्मांत नाहीं. शिवाय

' विविधतेंत एकरूपता पाहाण्याची दृष्टी ' हें जें परमतत्त्वाच्या ज्ञानाचें साधन तेंही त्या धर्माच्या प्रणालीपासून लांब आहे. त्यालाही खरें कारण असें कीं, ' अस्तीत्यैके नायमस्तीति चैके " वगैरेवरून दिसून येणारी विश्वाच्या अंतरंगपरीक्षेची वृत्तीच प्रेषितनिष्ठ धर्माजवळ असणें शक्य नाहीं. या वृत्तीनें " वासुदेवः सर्वमिति " ची संसिद्धि होण्याला अनेक जन्म लागतात असा जिथें गीतेचा शास्त्रशुद्ध सिद्धांत आहे तेथें पुनर्जन्मावर विश्वासच नसलेल्या ख्रिस्तानुयायांना आपला धर्म जागतिक धर्म होईल, असें कोणत्या तोंडानें म्हणतां येईल ? योग्यता असेल तर या जन्मीं नाहीं तर पुढील जन्मान्तरी, निर्भेळ मोक्ष ह्मणजे परमेश्वरमय होऊन परमेश्वराचें कार्य करीत राहण्याची संधि गीताधर्मानेंच प्राप्त होण्याची खात्री ख्रिस्तानुयायांसही अभ्यासानें पटेलच पटेल.

प्रेषितनिष्ठ असा दुसरा प्रभावी धर्म ह्मणजे महंमदीधर्म होय. त्याचाही ख्रिस्तीधर्माप्रमाणेंच आत्म्यावर विश्वास आहे, पण पुनर्जन्मावर नाहीं. अखिल मानवजातीकरतां फासावर लटकून समष्टीकरतां यज्ञ करण्याची शिकवण ख्रिस्तीधर्मांत असली तर व्यक्तीनें आपलें ' प्रियतम तेजस् ' ईश्वरार्पण करावें असा ' सुन्तेच्या ' द्वारां महंमदी धर्माचा धडा आहे. ख्रिस्तीधर्माला जन्मून दोन हजार वर्षें होत आलीं असलीं तर महंमदीधर्म अवघ्या चौदाशें वर्षांच्या घरांत पडतो. ६३२ वर्षांच्या फरकानें जन्मास आलेल्या या धर्मांनीं आपले काबूंत

सर्व जग घेण्यासाठीं सूक्तासूक्त मार्गांचा आणि समशेरसाम्राज्याचा उपयोग करण्यास कमी केलें नाहीं. तथापि 'मन एव मनुष्याणां कारणं बन्धमोक्षयोः' वा 'यो यच्छ्रद्धः स एव सः' हें गीताधर्माचें तत्त्व त्रिकालाबाधित असल्याकारणानें मनुष्याचें मन 'स्वधर्मानें' वागूं लागतांच, तें विचारी बनतें, आणि मग बाह्य लादालादीचा कांहीं एक उपयोग होत नाहीं. कारण विचारान्तीं कळून चुकतें कीं, ख्रिस्तीधर्माप्रमाणेंच महंमदी धर्माची मोक्षाची कल्पना ह्मणजे अदामची अवस्था ह्मणजे फार तर समष्टी होऊं शकते. गीताधर्माचा आरंभच मुळीं समष्टीशीं समरूप वागण्यानें होतो. हिरोडोटसच्या ग्रन्थावरून समजून येतें त्याप्रमाणें प्राचीन इजिप्शियन वा पर्शियन विद्वान ग्रीक तत्त्वज्ञानासारखाच पुनर्जन्मावर विश्वास ठेवीत. हिब्रूपैकीं फारीसीनीं तर महंमदी यांपैकीं 'सफी' नीं त्याला मान डोलावली होती. आणि गीताधर्माशीं एवढयापुरतें महंमदीयांचें जुळतें म्हणावयास हरकत नाहीं. मात्र शिया, सुनी, वहाबी या महंमदी पंथाला तें सर्वथैव अमान्य आहे. इतकेंच नव्हें तर आर्थर एन. वूलस्टन यानें चिकित्सल्याप्रमाणें तेवीस वर्षें 'परमेश्वरी स्फूर्तीनें' कधीं मक्केस तर कधीं मदिनेस महंमदाच्या तोंडून बाहेर पडणाऱ्या धर्मग्रन्थानें व्यक्तिनिष्ठ रंगेलपणाला समष्टीच्या निश्चित दृष्टीनें आळा न घातल्याकारणानें 'मुसलमान ह्मणजे देवाला वाहिलेला' हा कोशार्थ कोशांतच राहिला, आणि प्रेषित-प्रतिष्ठा बुवाबाजी व हम् करेसो

कायदा एवढा एकच परिणाम ' देवाला वाहिलेल्या लोकांत ' राहिला. अर्थात् अस्सल यज्ञाची जातीवंत भाषाच खुंटत असल्याकारणानें गीताधर्माचे पाठ ते घेतील तर खरी धार्मिकता किती तेजस्वी आहे, हें त्यांचें त्यांनाच अनुभवास येईल.

इतिहास कांहीं निराळेच कुञ्चले मारूं पाहतो आहे. अरबस्थानांतील खुद्द काबाचा दगड ह्मणजे एक वेळची महादेवाची शाळुंखा असावी, असा कांहीं संशोधक प्रवाशांनीं तर्क केला आहे. फार काय सबन्ध गीताच्या गीता उर्दू लिपीमध्यें कोरलेली तेथील एका दगडावर आढळलेली असून महंमदी पेहरावप्रचारांत वावरणारे किती तरी वैदिकसंस्कृतीचे लोक तेथें आढळतात, असें प्रवाशांचें प्रतिपादन आहे. हें खरें असेल तर या अंकुराला डहाळे, पानें फोडण्याचें काम गीताधर्माच्या उपासकांना जगत्कल्याणासाठीं करावयाचें आहे. कारण, बौद्धधर्मापासून आपल्या धर्मप्रणालीचीं तत्त्वें येसूनें तो तिबेटच्या आसपास हिंडत असतांना उचललेलीं असावींत असा प्राचीन वाङ्मयविशारदांचा कल आहे; आणि पलेस्टाईनच्या वाऱ्यावर स्वार होऊन अरबस्थानमध्यें त्याच तत्त्वानीं बरें वाईट ठाण मांडलें असावें असा एक तर्क आहे. याला कांहीं काडीचा आधार लागल्यास गझनीच्या महंमुदाबरोबर अरबस्थानांत गेलेल्या गीतेचा व वैदिक संस्कृतीचा तेथील अपुरा संस्कार आणि संसार पुरा करण्याची जबाबदारी गीताभक्तांवर येत नाहीं काय ?

प्राचीन इजिप्त, बेबीलोन, निनव्ही, मीडिया, इराण, ग्रीस, रोम, कार्थेज, चीन, जपान, मेक्झीको, पेरु इत्यादी देशांचा इतिहास अवलोकन केला असतां, " ना विष्णुः पृथ्वीपतिः " ही कल्पना कमीअधिक अंशानें साऱ्या जगभर साम्राज्य गाजवीत होती; पेरूतील इंकराजे आपणास सूर्यवंशी ह्मणवीत; जपानच्या मिकॅडो राजाला आजही देव मानतात; इंग्लंडची राजपूज्यता आजही सुटली नाहीं. तेव्हां कांहीं केलें तरी मनुष्यस्वभाव येथून तेथून सारखाच, एवढ्या एका अघळ-पघळ पण उथळ मुद्यावर गीताधर्माचा प्रचार सर्व जगभर होणें सुलभ आहे असें ह्मणणें नाहीं. ख्रिश्चन थिऑलॉजींतील स्पिरीच्युअल बॉडी आणि हिंदूचा लिंगदेह असल्या कल्पना जमतात. हिंदू गाईला देव मानतो तर ख्रिस्ती डोव्हला देव मानतो; किंवा विवस्वत मनूचा जो मनू त्याची नौका नक्रानें नेली आणि त्यानें पुढें " इडा " ही स्त्री उत्पन्न केली, ती कथा जुन्या करारांतील पहिल्या उत्पत्तिसर्गांत ६ ते ८ अध्यायांत मिळून आलेल्या नोहाच्या नौके-प्रमाणें आहे. असल्या भोळसट आधारावर गीताधर्म हा जगद्धर्म ह्मणून पटेल, असेंही प्रतिपादन नाहीं. किंवा हिंदुस्थान, अलेक्झांड्रिया, युरोप, चीन, जपान, तिबेट, अमेरिका, यांमध्यें पूर्वी जागतिक धर्माचा प्रयत्न झाला होता; राजकीय सत्तेच्या जोरावर पूर्वी बुद्धधर्मानें व नंतर ख्रिस्ती आणि महंमदी धर्मांनीं जग व्यापण्याचा प्रयत्न केला होता अगर थिऑसफी आज करीत आहे — असल्या गोष्टींकडे लक्ष

दऊन गीताधर्माची नवी ध्वजा जगभर मिरवावी अशी ईर्षाही गीताधर्माचा प्रसार प्रेरीत नाहीं. तर, एक वेळ आपल्या आमदानींत अर्धे अधिक जग व्यापणाऱ्या ख्रिस्ती अगर महंमदी धर्मापेक्षांही गीताधर्म जसा श्रेष्ठ आहे तसाच त्या धर्माहून मूळ असलेल्या बौद्धधर्मापेक्षाही तो श्रेष्ठ आहे. तत्त्वज्ञान, तंत्र आणि तारण ऊर्फ पौराणिक भाग कीं ज्यांत मनुष्यें व देव यांच्या जीवनाला तें तत्वज्ञान लावून दाखविलेलें असतें—अशीं धर्माचीं तीन प्रधान अंगें असतात; आणि तंत्र व तारण यांत जगांतील प्रचलित धर्माचा मेळ अगर विरोध अमुक एक प्रमाणांत आहे ह्मणून अमुक एक धर्म जागतिक धर्म होऊं शकेल असें नाहीं; किंबहुना तत्त्वज्ञानाच्या एकपरी बुद्धिगम्य श्रेष्ठतेवर व दुसरेपरी व्यवहार्य व्यापकतेवर कोणत्याही धर्माची जगद्धर्म म्हणून नांदण्याची लायकी ठरेल.

तेव्हां आतां भारतीय मर्यादेंतच विचार करतां, जैन धर्मानुसार जगाचा कर्ता म्हणून कोणी नाहीं; सगळें कांहीं कर्मानुसार घडत असतें. वैदिक धर्माच्या षड्दर्शनांतही असला सिद्धांत सांगितला आहे. याचप्रमाणें दोनही धर्मांतून तप व वैराग्य यांचा उपदेश असून स्याद्वादही सांगितला आहे. तशीच अहिंसा आहे कोठें ?

जरा सविस्तर उत्तर पाहिजे. मूळ वैदिक धर्मांत कित्येक यज्ञांतून पशुहिंसा होती व कित्येक साधे दुधतुपाचें यज्ञ होत. जी पशुहिंसा होती ह्मणून म्हटलें, ती देखील हळहळू लोपून पशूच्या बदली

व्रीही धान्याच्या बलिदानावर बाजू आली आणि फिरून पिठाचा पशु करून त्याचा होम करण्याचा राबता सुरूं झाला. जाणत्या माणसांनीं पशुहिंसेचा विलक्षण अर्थ करून यज्ञामधून पशुहिंसा अजिबात काढून टाकली. त्यांच्या विचाराप्रमाणें आपल्या अन्तःकरणाचा अहंकार हाच पशुरूप आहे नि याला ईश्वराला समर्पण करून यज्ञांत याचें बलिदान करणें योग्य आहे.

वैदिक धर्माची शाखा असलेला जो भागवत धर्म त्यानें हिंसा असणाऱ्या यज्ञाचा अतिशय निषेध केला आहे. श्रीमद्भागवतांत नारदांनीं प्राचीनबर्हि राजाला सांगितलें आहे कीं, " हे प्रजापालक राजा, तूं निर्दय होऊन यज्ञामध्यें हजारों पशूंना मारलें आहेस, ते तुझ्या निर्दयपणाची याद राखून परलोकांत तुझी वाट पहात राहिले आहेत. तें इतकें कीं, तूं ज्यावेळेस इहलोकांतून परलोकांत जावयास निघशील त्यावेळीं तुला लोखंडपोलादाच्या शस्त्रांनीं काटावयास ते तयार आहेत. "

यावरून दोन गोष्टी स्पष्ट होतात. वैदिक धर्मांत पशुहिंसा नव्हती असें जें कोणाकोणाचें ह्मणणें आहे, तें खोटें असल्याचें त्याला पटेल; आणि त्याच्या बरोबरच हेंही उघड होतें कीं, वैदिक धर्माच्या शाखांमधून पशुहिंसा बंद करण्याविषयीं पुष्कळच उपदेश आला आहे. यांत आश्चर्य कांहीं नाहीं. हिंदुधर्माचे तीनही सांप्रदाय ब्राह्मण, जैन व बौद्ध--एकाच जातीच्या एकाच प्रकारच्या जीवना-

पासून उत्पन्न झाले असून एकाच महावृक्षाच्या छाया आहेत.

एवढयाचसाठीं अमुक सिद्धांत केवळ एकाच धर्माचा असणेचा संभव नाहीं. आपल्या देशावर जैन धर्माचा कांहीं एक उपकार नाहीं असें मानणेंही बरोबर नाहीं. सर्व सिद्धांतात अहिंसेचें तत्त्व परमोच्च कोटीला नेण्याचें श्रेय जैन धर्माचें आहे. " अहिंसा परमोधर्मः " हा सिद्धांत वैदिक धर्माच्या सगळया पुराणांना व सांप्रदायांना मान्य आहे कीं जसा ब्राह्मण, बौद्ध, जैन, शीख आदिकरून सर्वांना सारखाच प्रमाण आहे. तथापि जैनशास्त्रकारांनीं विशेष प्रकारानें अहिंसेचा प्रचार करून निर्णय दिला आहे. ज्या ज्या व्यवसायांत अगर कामांत जाणून वा अजाणता जी अनेक प्रकारांनीं सूक्ष्मांतली सूक्ष्म हिंसा होत असते, तिचाही अतिसूक्ष्म विचार करून तिच्यापासून दूर सरण्याचा उपदेश मनुष्यास जैन शास्त्रानें केला आहे. परंतु इतक्या बारीक बुद्धीनें चालणें संतसज्जनसंन्याशांनाच शक्य आहे. आणि त्यांनाही वेळप्रसंगीं समष्टीच्या सेवेसाठीं ' अहिंसा ' बाजूला ठेवून दुष्टांचा निःपात करण्यावांचून गत्यंतरच उरत नाहीं. पण अशा तऱ्हेची खलहिंसा ही मुळीं हिंसाच होऊं शकत नाहीं, असें गीतेचें सांगणें आहे.

हिंदूंच्या ब्राह्मणादि शाखांच्या धर्मग्रंथांत देशकाल, वर्णाश्रम, धर्माधर्म, न्यायनीति इत्यादि संपूर्ण परिस्थिती लक्षांत घेऊन दुसऱ्या प्रकारानें अहिंसा वगैरेंच्या गूढ तत्त्वांचा सूक्ष्मांतला सूक्ष्म विचार केला आहे. ब्रह्मचारी, वानप्रस्थी त्याचप्रमाणें संन्यासी यांच्यासाठीं जैन

धर्माप्रमाणेंच सर्व प्रकारांनीं अतिसूक्ष्म अहिंसाव्रतपालन करण्याची त्या शास्त्रांनींही आज्ञा दिली आहे. अशा प्रकारें ब्राह्मण शाखेच्या ग्रंथामध्यें न्यायनीति यांना प्राधान्य देऊन निष्काम, आसक्तीरहित बुद्धीनें कर्तव्यकर्म करण्याची मुख्य आज्ञा मानली आहे. ह्मणूनच गृहस्थाश्रमींच्यासाठीं न्याय आणि धर्म यांच्या पालनाकरता अहिंसा-विरोधी युद्धादींची आवश्यकता पडल्यास त्या शास्त्रांनीं गैर मानलें नाहीं. मात्र कर्मांतील हिंसाहिंसाचें पृथक्करण करावयास गृहस्थाश्रमी समाजाला खरोखरच एकाद्या स्थितप्रज्ञ, ब्रह्मज्ञानी नेत्याची परमेश्वरी अवताराची जरूर असते.


## ७ धर्मांत धर्म गीताधर्म.

भगवान् धर्माच्या रक्षणासाठीं अवतार घेत असतो हें प्रायोगिक सत्य खास नव्हे, तर जनतेला कर्तव्याकर्तव्याचा व्यामोह पडतो, त्यावेळी शंभर टक्के शीलवन्त नि कर्तबगार पुरुष आपल्या आचर-णानें आणि मार्गदर्शनानें समाजाला वळण लावतो. अशा वेळीं समा-जाच्या मनांत त्या पुरुषाविषयींच्या आदरातिशयाचा जो स्थायीभाव असतो तो त्या पुरुषाचें वर्णन " अवतार " या शद्बानें करीत असतो. वेद तुच्छ आहे, ईश्वर नाहीं, आत्मा नाहीं, सर्व झूट आहे

इत्यादि भ्रांति ज्यांना झालेली असते त्यांना ब्राह्मणशास्त्रकारांनीं 'असुर' म्हणून संबोधिलें तें अर्थातच वरील कल्पनाही त्यांच्या चेष्टेचा विषय होते म्हणूनच. गौतमबुद्धानें किंवा त्याच्या बौद्ध धर्मानें वेदांची निंदा केली नाहीं तर ब्राम्हणांनीं काय शिकावयास पाहिजे व कसें व्हावयास हवें हें दाखवून दिलें. बौद्धधर्म एका प्रकारानें वेदापासूनच निघाला असून षट्दर्शनांपैकीं कपिलमुनिकृत सांख्य-दर्शनाची शाखा आहे. माणसाला गळूं झालें म्हणजे तो शस्त्रवैद्याकडे जाऊन तें कापून तरी घेईल, नाहीं तर त्याचें मारक काय, त्याची उत्पत्ति कशापासून याची चिकित्सा तरी करील. जग नित्य का अनित्य, त्याचा कोणी कर्ता आहे कीं नाहीं, तो कसला आहे ? या प्रश्नाशीं धार्मिक जीवनाचा वस्तुतः कांहीं संबंध नाहीं. वरील प्रश्न तत्त्वज्ञानदृष्ट्या निरर्थक नाहींत. परंतु आपलें कर्तव्यकर्म एके बाजूस सारून असल्या प्रश्नांच्या पोकळ काथ्याकुटांतच वेळ घालविणारांना गौतमबुद्धानें केला तसला उपदेश केला, तर बिघडले कोठें ? आकाशांतील तारे मोजत जाणारानें आपल्याला जमिनीवरून चालावयाचें आहे हें तो विसरला, तर त्याला कोण भला म्हणेल ? जैन धर्मातसुद्धां ईश्वराला न मानण्याचा मुख्य हेतु कर्माची महती गाणें एवढाच आहे. "सर्व शून्य आहे" असें जें भगवान् बुद्धानें सांगितलें असल्याचें मानण्यांत येतें, त्याचा अर्थ स्वनिष्ट संसाराचा मोह नाहींसा करणें एवढाच असून पापपुण्याची जबाबदारी दोन हात लांब टाकणेचा बरीक नाहीं.

यावरून स्पष्ट होईल कीं जैन, ब्राम्हण व बौद्ध धर्म हे परस्परांचे वैरी तर नाहींतच. पण पुष्कळ बाबतींत एकमेकांचे पूरक आहेत आणि असें असणें हेंच अत्यंत स्वाभाविक आहे. पहा कीं, एवढा प्रसार पावलेला बौद्ध धर्म जो जन्माला आला तो यज्ञाच्या नांवावर हिंसेचा अतिरेक झाल्यामुळेंच जन्माला आला. पुढें भिक्षुभिक्षुणींचा सुकाळ माजला तो आर्यधर्मांतील कर्मकांडाचें वास्तविक यज्ञ स्वरूप जाऊन जेव्हां वाणसौद्याचें स्वरूप आलें तेव्हांच. पण अशा तऱ्हेनें बौद्ध धर्म एकपरी तत्कालीन प्रचलित आर्यधर्मांतील कर्म कांडापासून फटकून निघाला आणि निर्वाणाच्या पलीकडे जगत्कारण ऊर्फ परमेश्वर अलग आहे ही कल्पना जरी बौद्ध धर्मानें अंगिकारिली नाहीं, तरी आत्म्याचें अमरत्वच काय ? पण पुनर्जन्महो बौद्धधर्म आपला आधारस्तंभ असें समजतो, आणि म्हणूनच झालें तरी शंकराचार्यास पुनरुज्जीवनी हिंदुधर्माचा प्रभाव झटकन् दाखवतां आला. शंकराचार्यांच्या अल्पायुष्यामुळें व पुढें त्यांच्या पीठस्थाच्या अनेक समजुतीमुळें आर्य धर्माचा प्रसार आर्यावर्ताच्या बाहेर होऊन बुद्धमय जगाला गवसणी घालूं शकला नाहीं ही गोष्ट खरी; पण शंकराचार्यांनीं निष्काम कर्मयोगाचा म्हणजेच खऱ्या संन्यासाचा अथवा गीताधर्माचा वा पारिभाषिक शब्दांत शिवपूजा ध्वजा फिरून आर्यावर्तांत फडकावून " यतः साक्षादभ्युदयनिःश्रेयस हेतुः स धर्मः " असें व्यवहारशास्त्र फैलावल्यावर बौद्ध धर्माची बोबडी वळली ! जग जिंकायला निघालेल्या अन्यधर्मजनक धर्माची अवस्था असल्या कारणानें,

महंमदीयांच्या संसर्गानें तत्कालीन परिस्थितीला तोंड देण्यासाठीं उत्पन्न झालेल्या धर्माचा फारसा समाचार घेत बसण्याचें कारणच नाहीं. शिखांचा " वा गुरुकफते " ग्रंथसाहेबांवरील निर्मलाश आणि उदासी यांच्या कथा असोत, सत्साहेबासह कबीरचे संन्यासी शिष्य राजपुतान्याचा धर्मधारक दादू, त्याचे शिष्य सुंदरदासपासून निश्चलदास यांचे ग्रंथ, लालगुरूचे शिष्य 'भंगीमेहेतर' या सर्वांना श्रुति आधार, गीताभाष्य मान्य आणि शारिरिक सूत्र प्रमाण आहे एवढे लक्षांत बागवलें म्हणजे " वेदांतींचे हितगुज " बहुजन समाजाच्या आटोक्यांत येण्याकरितां निघालेल्या " महाराष्ट्र धर्मासंबंधीं " अगर इतिहास पूर्वकालीं आर्य धर्माबरोबर नांदत असल्याचा ज्याचा पाश्चात्य इतिहासकार उल्लेख करतात त्या झोरोस्ट्रारच्या ऊर्फ सूर्योपासनेच्या धर्मासंबंधीं अकारण ऊहापोह करण्यांत हंशील उरत नाहीं. कारण झोरोस्ट्रारचा धर्म म्हणजे आर्य धर्माची एक भिन्नरूप शाखा आहे इतकेंच. आणि इतकें सारें जर खरें, तर आर्य धर्मांतीलच निरनिराळ्या सांप्रदायोपसांप्रदायांची विचिकित्सेनें फोड करून गीता धर्माच्या वर्तुळ व्यापांत ते येतात, हें दाखवून कालहरण करीत बसण्यांत काय किफायत ? जगांतील झाडून सारे प्रमुख धर्म गीताधर्माच्या आटोक्यांत कसें येतात तें पहा:--


परमेश्वर.
नास्तिकवाद
( मिल्ल स्पेन्सर )
संशयवाद
( जैन वगैरे )
निर्वाण
( बौद्ध )
आस्तिकवाद
द्वैत ( मध्वादि सांप्रदाय )
अद्वैत
केवळ विश्वातिरिक्त
(फ्लेटो, डेकार्ड, कँट)
एकेश्वरी
विशिष्ट एकेश्वरी
सामान्य एकेश्वरी
मिश्र एकेश्वरी
( खिस्ती धर्म )
शुद्ध एकेश्वरी
( महंमदी धर्म )
केवळ विश्वव्यापी
(अरीस्टॉटल, टेकेल स्पायनोसा )
विश्वातीत
(वेदोपनिषदें)
सर्वेश्वरी
अनेकेश्वरी
(चातुर्वर्ण्यात्मक वैदिक धर्म, प्राचीन इजिप्त, खाल्डियर, असीरिया, अरबस्थान, इराण, ग्रीस, कार्थेज, मेक्सिको पेरू, चीन, जपान यांचा धर्म )
गीता धर्म

# ८ गीता धर्माची योग्यता व यज्ञकल्पना.

भारताचार्य चिंतामणराव वैद्य म्हणतात त्याप्रमाणें " कोणत्याही जातीचा किंवा मताचा मनुष्य असो, तो परमेश्वराच्या कोणत्याही विभूतीच्या भक्तीनें मोक्षास जाईल हें अत्यन्त उदात्त तत्त्व श्रीकृष्णानें भगवद्गीतेंत प्रतिपादिलें आहे. " आणि हीच गीताधर्माला, जागतिक धर्म ह्मणून नांदण्यासाठीं योग्यता आहे. विवेकानन्दांनीं प्रतिपादिल्याप्रमाणें " प्रत्येकाला लागू पडेल असा जर जागतिक धर्म हवा असेल, तर तो धर्म नुसत्या भागविभागांचा असतां कामा नये, तर तो सततचा सर्वग्राही असला पाहिजे. " आणि असें व्हावयाचें ह्मणजे (१) विनाशापेक्षां विकासावर लक्ष देऊन (२) मनुष्य जेथें जसा असेल तेथून तशाच अनुषंगानें त्याला उत्क्रांतीमय उच्चत्व येण्यासाठीं कर्मरत, भावोपजीवी, मानस चिकित्सक, आणि तत्त्वप्रेमी असे मनुष्यांतील चार प्रकार, ते लक्षांत घेऊन अचूक मार्गदर्शन करील तोच जागतिक धर्म होऊन बसेल. " उच्चतम तत्त्वज्ञान, तीव्रतम बुद्धिवाद आणि अगदीं त्यांच्या बरोबरीनें नवनवलसंचारी अन्तःकरण यांचा मिलाफ असेल; शास्त्र आणि धार्मिक तंत्र एकमेकांच्या हातांत हात घालून चालतील; काव्य आणि तत्त्वज्ञान

गळयांत गळे घालतील; तोच शाश्वत, सनातन व सर्वग्राही धर्म भविष्यकाळी नांदेल. " अशी ग्वाही विवेकानंदानीं दिलेली आहे. गीताधर्मामध्यें अगर खुद्द गीतेमध्येंही काव्य व तत्त्वज्ञान यांची संगती कशी बेमालूम साधली आहे, हें सर्वश्रुत आहे. धार्मिक तंत्र म्हणून विशिष्ट प्रसंगीं विशिष्ट कृतीचीं कोष्टकें अगर कवाईती गीतेनें दिलेल्याच नाहींत. जो एक तंत्राचाच म्हणून सर्वसाधारण आराखडा दिला आहे तो शास्त्राला म्हणजे सायन्सला बिलकूल सोडून नाहीं. मानवी जीवनाची सुखमय उत्क्रांती हें शास्त्राचें ध्येय व त्यास अनुसरून चिकित्सेचें बारीक संशोधन, संशोधनाचें संयोगीकरण, संयोगीकरणाचा सुखासुखी प्रवाह आणि या सर्वांना लागणारा निढळा उद्योग हीं शास्त्राचीं साधनांतील मुख्य साधनें. गीताधर्माच्या तंत्रानें हें सारें कबूल केलें आहे, इतकेंच नव्हे तर त्याच्याहि पुढें उडी मारली आहे. समष्टीमय अधिष्ठान, आत्मविश्वासपूर्ण कर्ता, पृथग्विध साधनें आणि " विविधाश्च पृथक्चेष्टाः " म्हणजे निरनिराळे व स्वतंत्र जोम कार्यसिद्धीकरतां सांगितलें असून वर कर्त्याच्या ' सत्त्वा 'चा संन्यास प्रतिपादिला आहे. गीतेचा संन्यास म्हणजे जगापासून मुरडून कुठेंतरी बाजूला बसून वा पडून रहावयाचें नाहीं. असलें पडेपण जर संन्यास असेल तर तें सोपें आहे. गीतेला तें अमान्य आहे. विवेकानन्द म्हणतात कीं, " संसारांत राहून परमेश्वराची पूजा करणें अवघड आहे. " ही पूजा देहनिष्ठ ' स्व 'चा संकोच करून आणि ' आत्म ' निष्ठ 'स्व' चा सर्वपूर्ण

विकास ज्या मानानें होईल, त्या मानानें बरोबर साधली, असें गीतेचें प्रतिपादन आहे. आणि ह्मणून "पत्रं, पुष्पं, फलं, तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति" या श्लोकांत एक तऱ्हेनें व "येऽप्यन्यदेवता भक्ता यजन्ते श्रद्धयान्वितः" या श्लोकांत दुसऱ्या तऱ्हेनें भगवान् श्रीकृष्णानें हरएक माणसाला आपले शाळेंतील सोयीचा वर्ग दाखवून सोय केली आहे. धनगरानें दाणे अगर धोंडे मांडून हिशेब केला, एकाद्या शिकाऊ पाठयानें पाढयांच्या पोपटपंचीनें हिशोबाचा पार पाडला, आंकडेमोडयांनीं बेरीज व वजाबाकीनें हिशोबाचें गणीत केलें, सराइतानें 'चाली' वरून चटकन हिशेब ठोकला, तरी बिनचूकपणा, जसा सर्वांचा सारखाच. पण ज्याच्या त्याच्या पद्धतीवरून जशी ज्याची त्याची इयत्ता लागावयाची! अगदीं त्याचप्रमाणें संन्यासाची गोष्ट आहे. फिरून, इयत्तावार अभ्यास व हिशोबाचे आराखडे असले तरी शिक्षकाच्या लायकीचा हातगुण विद्यार्थ्यांच्या समजावणींत दिसतोच. याहीउप्पर विद्यार्थ्यांची जातीची लायकी म्हणून कांहीं असतेंच. या सगळया गोष्टींचा विचार करून एकाद्या शिक्षण संस्थेचा चालक "डाल्टनच्या डोक्याचा" असेल तर, विद्यार्थ्यांस संपूर्ण स्वातंत्र्य देऊन त्यांच्या कुवतीप्रमाणें झेपेल तो अभ्यासक्रम चाहील त्या शिक्षकाच्या हाताखालीं पार पाडावयास परवानगी देईल; पण परीक्षा आणि शाळेच्या ब्रीदवाक्याप्रमाणें पारितोषिकें आपल्या हातीं राखील व शाळेचें ध्येय अमुक एक असें सारखें ठसवीत राहील. बस्स! हीच गोष्ट गीताधर्मानें केली आहे. झेपेल तेवढा शुद्ध

यज्ञ, असेल त्या देवतेवर निष्ठा ठेवून प्रत्यक्ष कर्माचरणानें केला तरी तो गीताधर्माला वावडा नाहीं. मात्र सर्व समष्टीकरतां देहनिष्ठ प्रत्येक गोष्टीचा यज्ञ करून सहज किंवा नियत काय असेल तें प्राप्त कर्तव्य केलें पाहिजे असा गीताधर्माचा आग्रह आहे. " अनेकीं सदा एक देवासि पाहे " अगर " मत्तः परतरं नान्यत्, " " मत्तः सर्वं प्रवर्तते " किंवा "प्रभवःप्रलयः स्थानं निधानं बीजमव्ययम् " वगैरे श्लोकांचा उलगडा शिक्षण संस्थेच्या ' डॉल्टनी ' चालकांच्या उदाहरणानें पटेल आणि ' अद्वैत ' सिद्धांत हाच गीतेचा जीवात्मा शिवात्म्यासंबंधीं सिद्धांत असला, तरी द्वैताची हेळसांड गीतेनें केली नाहीं, हें साहजिक पटेल.

पण ' मनुष्याची भूमिका ही द्वैताची असो वा अद्वैताची असो, ' समष्टीच्या सेवेकरतां म्हणजेच 'श्रेया'साठीं— 'प्रेया'साठीं ( संकुचित ' स्व ' साठीं ) नव्हे — सहज व नियत कर्तव्य केलेंच पाहिजे; असा गीतेचा कटाक्ष आहे. ' शरीरयात्राऽपि च ते न प्रसिध्येदकर्मणः ' यांतील सत्य जर सर्वथैव खरें, तर ' श्रेया 'साठीं कर्माची अत्यंत आवश्यकता नाहीं काय? मात्र हें कर्म कर्मच न वाटण्याइतकें ' हातचा मळ ' होऊन बसलें पाहिजे. गीता संन्यास म्हणून संबोधेत तें यालाच. ' मोक्ष ' म्हणजे जी माणसांची मनोवृत्ती व्हावयाची ती कोणत्याही कर्मांतील निष्णातपणा आपल्या अंगीं मुरल्यामुळें कर्माचें कांहींच वाटेनासें होण्यांत होतें. म्हणून कर्माचा त्याग मात्र गीतेला मंजूर नाहीं. कारण वरील वृत्ति ही कर्माशीं तादात्म्य पावून स्वतःला विसरण्यानेंच येत असते, हें विसरून चालणार नाहीं. हें एक व

दुसरें असें कीं, ती वृत्ति बाणल्यावर " यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः " या न्यायानें एकपरी ' लोकसंग्रहार्थ ' तर दुसरें परी ज्या जगांत जो वावरतो त्याचा कर्तव्यपक्ष घटक म्हणून कर्म माणसानें टाकतांच कामा नये, आपल्या बरोबर आपल्याशीं संबंधितांच्या विकासाचें बीज यांतच आहे. एवढयाचकरतां ' कर्मसंन्यासात्कर्मयोगो विशिष्यते ' असा गीतेचा भर आहे.

अशा तऱ्हेनें, हेगेलच्या त्रिपादात्मक ऐतिहासिक पद्धतीनें चिकित्सेला गीताधर्म पुरून उरतो. ह्मणजे गीताधर्मांत ज्ञान-कर्म-भक्ति योगाचा मिलाफ तर आहेच; पण शिवाय गीतापूर्व धर्मशास्त्रांचा संमेलनदृष्ट संदेशही आहे.

(१) वेदांतील अनेक देवतांचें अस्तित्व आणि त्यांची उपासना गीतेनें मान्य केली तरी ती खालची इयत्ता गीतेनें ठरवली व " एकं सद्विप्रा बहुधा वदंति " हा निष्कर्ष मान्य केला. (२) यज्ञाची कल्पना, अग्निला आहुती देऊन स्वताच्या देहाचे वा मनाचे चोचले पुरवणें हें त्या यज्ञाचें फल, एवढी क्षुद्र न समजतां, यज्ञ ह्मणजे ऋणाची फेड—कार्यकारणभावांच्या चिकित्सेनें कार्याच्या निकटान्वयी वा दूरान्वयी कारणाचा कृतज्ञतेनें संक्षेप ह्मणजेच देहाधिष्ठित ' स्व ' चा साधेल तितका संकोच व समष्टीमय ' स्व ' चा साधेल तेवढा व्यापक विकास. मानवशास्त्रांत बोलावयाचें तर " मन एव मनुष्याणां कारणं बंधमोक्षयोः " हें लक्षांत घेऊन आधुनिक पाश्चात्य भौतिक

शास्त्रीय शोधाप्रमाणें वेदांताचा भर जो वस्तुनिष्ठ सुखावर तो झुगारून मनोनिग्रहामुळें जो मनाचा समष्टीमय विकास होतो व त्यामुळें जें उच्चतम सुख अन्तःकरणांत आपोआप होतें, तीं दोनही साधणारा तो गीतेच्या चष्म्यानें खरा यज्ञ होय. " ज्या आईबापांनीं जन्म ह्मणजेच शरीर देण्यापलिकडे कांहीं एक केलें नाहीं, त्यांच्यासाठीं मुलांनीं काय म्हणून कृतज्ञ रहावें ? " हा बाजारी सौद्याचा प्रश्न करणारांना गीतेनें यज्ञाच्या कल्पनेंत सुंदर उत्तर दिलें आहे; नाहीं ? वसुदेव-देवकीपासून देहापलिकडे कांहीं प्राप्त झालें नाहीं तरी ' श्रीकृष्ण वसुदेव यादव ' हें नांव जोंपर्यंत धारण करावयाचें आहे, अर्थात् त्यांच्यापासून प्राप्त झालेल्या देहानेंच जोंपर्यंत जगांत वावरावयाचें आहे, तोंपर्यंत जगांतील कसल्याही कर्तबगारीच्या मूळघटकापैकीं अत्यन्त क्षुल्लक असा ' निमित्तमात्र ' जो देह तो ज्या मायबापापासून प्राप्त झाला त्यांच्याबद्दलच्या कृतज्ञतेचें ऋण मुलांच्या डोळयावर राहतेंच. शिक्षणसंगोपनादि अनंत उपकार ज्या आईबापांनीं केले असतील, त्या आईबापांनाही जेथें समष्टीसेवेच्या दृष्टीनें वेळेस हातावेगळे करावें लागतें, तेथें केवळ जन्मापलिकडे ज्यांचा संबंध नाहीं अशा आईबापांना मागें सारावें लागेल—सारलेंच पाहिजे यांत वाद नाहीं. पण मग जन्मापुरताच आईबापांशीं संबंध असणारावर जगाकरतांच सर्व जीवन वाहण्याचें कर्तव्य येऊन पडतें, हें विसरून चालणार नाहीं. हें एक दुसरें असें कीं, जगत्कार्यालादेखील ज्या देहाचा उपयोग होणार तो देह ज्या आईबापापासून मिळाला, त्यांच्या

त्या अल्पस्वल्प ऋणाची फेडहि त्यापरीनें केली पाहिजे. कारण ज्या जगाकारितां वा समष्टीकारितां मुलानें सेवारत व्हावयाचें, त्या जगाचे किंवा समष्टीचे अशंभूत घटक ते आईबापही असतातच नाहीं कां?

## ९ उपनिषदें, गीता व श्रीकृष्ण.

स्वर्गप्राप्ती ह्मणजे एक तऱ्हेनें सुखाचा परमावधी मिळविणें हाही झाला तरी एक प्रकारें मानवी कर्तबगारीचा झेंडा असेल; पण त्यांत देहनिष्ठ " स्व " चा संपूर्ण संक्षेप साधतच नाहीं. ह्मणून उपनिषदांनीं मानवी जविनाचें तें ध्येय मान्यच केलें नाहीं. तर मोक्ष ह्मणजे जगत्कारणाचें वा परमात्मतत्त्वाचें अनुभवात्मक ज्ञान होऊन जाणें असेंच ध्येय उपनिषदांनीं मानवी जीवनाचें मानलें आहे, व तेंच गीतेनेंही प्रतिपादिलें आहे. (२) अर्थात् जीवात्मा व शिवात्मा ह्मणजे भूतकालांतील चैतन्य आणि जगत्कारण (स्पेन्सरनें उत्क्रांतीची व्याख्या केल्याप्रमाणें ज्याच्यापासून भेदोत्पत्ती अथवा विषमावस्था उत्पन्न होऊन द्रव्य व गती यांच्या ‘ तत्कालीन समतोलना ’ मुळें द्रव्यांच्या भिन्नभिन्न स्वरूपांला पूर्णता येते तें सृष्टीचें आदितत्त्व) एकच आहेत हा उपनिषदांचा सिद्धांतही गीतेस मान्य आहे. (३) आणि ह्मणूनच शद्बांनीं बोलावयाचें तर ‘ सर्व शास्त्रांतील सिद्धांतांचें एकीकरण

करून तद्वारां सृष्टीच्या मुळाशीं असलेल्या आदितत्त्वाचें निदान आणि त्या तत्त्वाची विकृति ' म्हणजेच खरें तत्त्वज्ञान पटून आदितत्व ऊर्फ ब्रह्म हें जसें सृष्टीचें उगमस्थान तसेंच तिचें पर्यवसानही आहे, हेंही उपनिषदांचें म्हणणें गीतेनें स्वीकारलेलें आहे. (४) उघडच, "ब्रह्म-सत्यं जगन्मिथ्या " हें " सर्वव्यापक आदितत्व आणि त्याच्या निर-राळया परिपूर्ण विकृति यांचा उलगडा कार्य-कारण--चिकित्सेनें करतां करतां ब्रम्हाशिवाय बाकीचें धारण केलेलें रूप नाटक असें कळतें, " एवढयाच दृष्टीनें उपनिषदाप्रमाणेंच गीतेनेंही स्वीकारलेलें आहे. (५) पण " परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृतां । धर्म संस्थापनार्थाय " आणि लोकसंग्रहार्थ व अधर्माच्या उच्छेदाकरतांच मानवी जीवन व्यतीत झालें तरच तें समष्टीच्या दृष्टीनें झालें हें स्पष्ट लक्षणांनीं गीतेनेंच प्रथम सांगितलें; आणि (६) तसें करावयाचें तर संन्यासापेक्षां कर्मयोगच अधिक परिणामी म्हणून गीतेनें उप-निषदांपेक्षां किती तरी जास्त आग्रहानें त्यावर भर दिला आहे. तथापि (७) इतक्या सगळया तंत्रांत स्वताच्यामधील चैतन्यतत्त्व म्हणजेच जगाचें आदितत्त्व अशा अवस्थेनें जगताचें कार्य होऊं लागणें हाच खरा जीवन्मोक्ष असला तरी, त्या एकरूपतेची प्रथम जाणीव होऊन त्या जाणीवेचा मग संन्यास झाला पाहिजे-नव्हे, होतो. तथापि तशी मूळ जाणीवच होण्यास " ज्ञान " हें एकच साधन आहे. अर्थात् " ज्ञानदेव कैवल्यम् " म्हणजे ज्ञान आत्मसात् झाल्यानें--रोम-रोमीं मुरल्यानें जें एक तऱ्हेचें अजाणीवेचें कर्तृत्व येतें तें मनुष्याला

साधलें पाहिजे हें औपनिषदिक प्रतिपादन गीतेनेंही शिरसावंद्य केलें आहे.

. अशा तऱ्हेनें गीताधर्म हा सर्वसंग्रही असला तरी तो प्रवर्तविणारा श्रीकृष्ण मोठा घमेंडखोर दिसतो ! कारण ' स्व ' चा सर्वतोपरी संकोच करावयास सांगणारा श्रीकृष्ण जेथें तेथें ' स्व ' चा टेंभाच मिरवतांना आढळतो. तेव्हां जो धर्म नुसत्या शद्बापुरतासुद्धां स्वतः श्रीकृष्णाला आचरतां आला नाहीं, तो दुसऱ्याला कसा येणार ? असा एक आचरट आक्षेप गीताधर्मावर आहे. शद्बपांडित्याच्या नजरेनें पहातां सकृदर्शनीं तो खराही भासतो; पण अंतरंगपरीक्ष-कांना यांत कांहींच तथ्य वाटत नाहीं. महाभारतांत " अनुगीता " मागून घुसडलेली आहे, ही गोष्ट खरी. पण तिच्या आरंभीं दिलेली कबुली मुख्य गीतेसंबंधांत लक्षांत ठेवण्यासारखी आहे. कुरुक्षेत्रावर अर्जुनाला श्रीकृष्णानें गीता सांगितली ती योगयुक्त चित्तानें सांगितली, हीच ती कबुली होय. जगत्कारणाशीं एकरूप होऊन गीतापूर्व तत्त्वज्ञानांच्या समन्वयानें कर्माकर्माची शास्त्रशुद्ध मीमांसा सांगत अस-तांना, श्रीकृष्णानें ' मीं ' ' माझें ' ' मला ' असे शद्बप्रयोग केले आहेत. आणि या ' मी ' ची व्याप्ती विवस्वानाला योग सांगण्यापर्यंतच पाठीमागें जाऊन थबकली नाहीं, तर " मम योनिर्महद्ब्रह्म तस्मिन् गर्भं दधाम्यहं । संभवः सर्वभूतानां ततो भवति भारत ॥ " येथपर्यंत लांबली आहे. सृष्टीसंभवापासून जसा हा श्रीकृष्णाचा ' मी '

संचारला आहे तसाच तो " यद्यद्विभूतिमत्सत्त्वं श्रीमदूर्जितमेव वा । तत्तदेवावगच्छ त्वं मम तेजोंऽश संभवम् ॥ " फार काय, " विष्टभ्याहमिदं कृत्स्नमेकांशेन स्थितो जगत् " असा व्यापकही आहे. खरें समष्टीपलिकडील मोठेंपण श्रीकृष्णाच्या मनानें धारण केलें असल्याकारणानें श्रीकृष्णाचा " अहं " अत्यंत आत्मविश्वासाचा निदर्शक आहे. आणि जोंपर्यंत भाषेनें बोलावयाचें आहे तोंपर्यंत, समष्टीपलीकडील मनाचें स्वरूप वास्तविक अमूर्त असलें तरी शद्बांच्या घडावानें देतांना असेंच संकोचाचें असणार. तथापि सामान्यांच्या " मी " त आणि श्रीकृष्णासारख्या योगेश्वरांच्या 'मी' त अगणित अंतर असतें. समर्थांच्या भाषेंत बोलावयाचें तर " उंच वस्त्रें नीच त्याला । आणि समर्थ उघडाचि बैसला । परीक्षावन्तीं परीक्षिला । थोर कोण । १ । "

# गीताधर्म आणि त्याचा वारस.

स्वतांसंबंधीं आणि आपल्या भोंवतींच्या जगासंबंधीं पुष्कळ प्रकारें आकलन होतें तें ज्ञानामुळें होय. स्वतांमध्यें सर्वोत्कृष्ट असेल त्याचा उत्क्रांतिमय विकास साधून धीरोदात्त जीवन काढणें व दुसऱ्यांना तसें करावयास मदत करणें हीं कामें मनुष्य संस्कृतीचे जोरावर करीत असतो. ज्ञानाला पद्धतशीरपणाची जोड देऊन मनुष्य शास्त्र

बनवितो. असल्या शास्त्रीय ज्ञानाच्या जोरावरच गेल्या दोन शतकांत, एच् जी. वेल्स ह्मणतो त्याप्रमाणें बाष्प, तेल, विद्युल्लता, वायु, वातावरण, अंतर वगैरेंवर चढाई करून भौतिकदृष्टया " अशक्य " हा शद्बच मनुष्यानें वायबार करून सोडला आहे. औद्योगिक, आर्थिक, राजकीय, सामाजिक क्षेत्रांत आणि युद्धकला व शांतिरक्षण-कला यांत विलक्षण क्रांति शास्त्रीय ज्ञानाच्या जोरावर मनुष्यानें केली आहे.

पण कोणतीही व्यक्ति, भूमि अगर एकंदरीनें सारी पृथ्वीही अस्सल सुखाचा एका अंशानेंही उपभोग घेत नाहीं. यंत्राच्या फाजील वाढीबरोबर बेकारी बकासूर होऊन बसली; शांतिसंरक्षणासाठीं सज्ज झालेली शस्त्रास्त्रें आगामीं युद्धाच्या निशाण्या होऊन राहिली; आणि जिकडे तिकडे प्रचलिताच्या विरुद्ध बंडखोरी उभी ठाकली. विचारी संशोधकांची मजल तर येथवर आली आहे कीं, पाश्चिमात्यांचा शास्त्रीय सुधार सपशेल सडला आहे, असें ते उघड प्रतिपादितात. त्या सुधाराचें सामर्थ्य संजीवनापेक्षां संहाराचें आहे. अर्वाचीन सुधा-रणुकीमध्यें आमूलाग्र फरक झाल्याशिवाय जगाची धडगत नाहीं असेंही कांहीं संशोधकांचें मत आहे. जागतिक महायुद्धानंतर निःशस्त्री-करण परिषदा व राष्ट्रसंघ जगच्छांतीसाठीं स्थापन झालें, पण अजून शांतियुगाचा ' श्रीगणेशा ' काढावयासाठीं सरळ रेघही त्यांना मारतां आली नाहीं. याचें प्रमुख कारण हेंच कीं, शास्त्रीय शोधांनीं मनु-

ष्याच्या इच्छा आणि विकार—इंद्रियाकांक्षा—उपभोगेच्छा तृप्त व प्रज्वलित करण्यावर भर ठेवला, आणि अशा तऱ्हेनें मनुष्यांतील पशुपण तेवत ठेवलें, त्याला परमेश्वरत्वाकडे जाण्याचा मार्ग दाखविला नाहीं. आर्यसंस्कृति ह्मणा अगर तिचा प्रतिनिधी जो सर्वव्यापी गीताधर्म आपलें श्रेष्ठत्व प्रस्थापित करतो तें नेमकें येथेंच. नराचा नारायण होण्याची खरी विद्या येथें आहे.

मनुष्याला आर्थिक, सामाजिक, राजकीय, बौद्धिक प्राणी म्हणून संबोधण्याचा एकांगी चष्मा गीतेजवळ नाहीं. मनुष्य जीवात्मा आहे. म्हणजे शिवात्म्याचा ऊर्फ जगत्कारणाचा समर्याद प्रतीक आहे. आणि म्हणूनच मनुष्याच्या सर्व व्याख्या जमेस धरून त्या सर्वांपेक्षांही वरच्या दर्जावर मनुष्य आहे, असें गीताधर्म मानतो. या महानुभावाची प्रतीति इंद्रियोपभोगांनीं नव्हे तर रोजच्या जीवनांत शिस्त आणून "इंद्रियार्थेषु वैराग्यं" नें मिळत असते. धर्माचें केंद्रीभूत तत्त्व हें होय. धीरोदात्त जीवनाचें कलापूर्ण शास्त्र म्हणजे गीताप्रतिपादित "काळाला पुरून उरणारा" ऊर्फ सनातन धर्म होय. या धर्माच्या आचरणानेंच जगांतील किती तरी कोडीं सुटणार आहेत. गीतेनें मूर्तिपूजकापासूनच काय, पण प्रत्यक्ष नास्तिकापासून सर्वांची सोय आपल्या शाळेंत केली आहे. निराकार, निर्विकार जगत्कारणाचा कोणत्याही तऱ्हेनें साध्या शद्बांनेंही उल्लेख करणें ह्मणजेच त्या जगत्कारणाची शद्बमूर्ति पूजणें होय. हें मानवजातीला कोठेंच सुटलेलें नाहीं. पण त्या जग-

त्कारणाचा शब्दातीत अनुभव मानवी बुद्धीला शक्य आहे. तोच माणसाला खरें शाश्वत सुख देत असतो. सृष्टीच्या क्षेत्रक्रमास सृष्टी-पेक्षांही श्रेष्ठ होऊन गति देत राहणें याच्यापेक्षा मानवी बुद्धीला आकलन झालेलें मोठें ध्येयच नाहीं. हें ध्येय असक्या तमक्या व्यक्तीचा, वर्गविशेषाचा, वर्णविशेषाचा अगर वंशविशेषाचा राखीव हक्क नसून संपूर्ण व्यक्तिस्वातंत्र्यानें, संपूर्ण आचारविचारस्वातंत्र्यानें, पण समष्टीसेवेच्या आणि आत्मोन्नतीच्या ध्येयनिष्ठ नजरेनें चालणाऱ्या जगांतील कोणाही व्यक्तीचा तो सरळ अप्रतिबंध हक्क असून त्याबाबत अल्पस्वल्प आचरणही वाया जात नाहीं. हा गीताधर्माचा आदेश आहे, हा जागतिक शांतियुगाचा सर्वसंग्रही धर्म आहे. तें युग व तो धर्म प्रचलित करावयासाठींच आर्यस्थानाचें नांव अनेक अस्मानी आपत्तींतूनही गाजत राहिलें आहे. आणि ह्मणूनच आर्यस्थानाच्या सन्तानावर ही जबाबदारी आहे कीं, श्रीकृष्णासारख्या पूर्णत्वाला पोंचलेल्या पूर्वजांचें हें तेजस्वी धन—हा गीताधर्म—जगाला देऊन आणि जगाकडून त्याचा व्यवहार करवून धन्य धन्य व्हावें. गीताधर्म हाच जगाचा धर्म, श्रीकृष्ण वा श्रीव्यास हाच त्या धर्माचा वक्ता आणि श्रीकृष्णाचा वा श्रीव्यासाचा तेजस्वी वारस हाच खरा जगद्गुरु.

---

विनंति—

या पुस्तकांत कांहीं नजर चुकीनें दोष राहिले असल्यास त्याबद्दल प्रिय वाचक मला क्षमा करतीलच. तथापि कांहीं दोष दृष्टोत्पत्तीस आल्यास ते पुढील आवृत्तींत सुधारण्यांत येतील. — प्रकाशक.

## —: पु. पां. गोखले यांची पुस्तकें :—

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जागृत सातारा | किं. १ रु. | |
| २ | परिचित सातारा | ,, ५ आणे | |
| ३ | सातारा जिल्ह्याचीं कालवाचक क्रियापदें | ,, ३ | ,, |
| ४ | साहित्यिक कऱ्हाड | ,, २ | ,, |
| ५ | गीताधर्म-प्रवेश | ,, ८ | ,, |
| ६ | अेकाध्यायी गीता | ,, १ | ,, |
| ७ | बोल—बाला | ,, ८ | ,, |
| ८ | आगरकर चरित्र | ,, ६ | ,, |
| ९ | ललित लहरी | ,, २ | ,, |
| १० | गोखले आणि— | ,, १२ | ,, |
| ११ | झाकले माणिक | ,, ८ | ,, |
| १२ | नामांकित सातारा ... ... | | |
| १३ | आगरकरांशीं ओळख ... ... | | |
| १४ | शूरसेन .... ... | | |
| १५ | समर्थांचा धांवा .... .... | | |

प्रकाशकः—

सौ. सुलोचनाबाई गोखले, सोमवार पेठ, कराड.

मुद्रकः—

डॉ. ना. पां. कोल्हापुरे, श्रीलक्ष्मी प्रेस, कराड.